आंदोलन

वर्ष 17 | अंक 01 | मूल्य 25/-
शाश्वत विकासासाठी
ऑगस्ट 2025 | पृष्ठे 36

महाराष्ट्राची आन - बान - शान!

राजकारणातील मिंधे, राज्य लुटून खाणार! लाचार गुलामांचा बाजार कधी थांबणार?

आंदोलन
शाश्वत विकासासाठी

जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वयाचे
मासिक संवाद माध्यम

शाश्वत विकास न्यासाचा उपक्रम

वर्ष सतरावे, अंक पाहिला
ऑगस्ट २०२५ ❀ मूल्य रु. २५/-

■ **संपादक**
मेधा पाटकर

संपादक मंडळ
प्रा. सुभाष वारे, मीनल उत्तुरकर,
अमेय तिरोडकर, सुनीती सु. र.,
सुरेश सावंत, साधना दधीच,
मिलिंद चंपानेरकर, राज असरोंडकर

■ **कार्यकारी संपादक**
संजय मंगला गोपाळ
९८६९९८४८०३

■ **व्यवस्थापक**
शरद जोशी
७०४५००३६४०

■ **पत्रव्यवहार व वर्गणी पाठविण्याचा पत्ता**
आंदोलन शाश्वत विकासासाठी
द्वारा शरद जोशी
बी/ ९, मेघमल्हार, गावंड पथ,
मल्हार सिनेमा जवळ, नौपाडा,
ठाणे (प.) ४००६०२

■ **अक्षर मांडणी**
पंकज गुरव

■ **मुखपृष्ठ मांडणी**
प्रतीक ठाकूर

■ **मुखपृष्ठावरील छायाचित्रे**
'आंदोलन'च्या संग्रहातून व इंटरनेटवरून

■ **मुद्रणस्थळ**
श्री गुरुकृपा प्रिंटर्स, माहिम, मुंबई - १६

■ **शाश्वत विकास न्यासाचे कार्यालय :**
द्वारा - ६, राघव, श्री रघुराज सोसायटी,
सिंहगड रस्ता, पुणे ४११०३०

■ दर महिन्याच्या १ तारखेला प्रसिद्ध होते.

■ अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

संपादकीय/राज्याचा लौकिक पार धुळीस मिळवण्यास सत्ताधारी आतुर!/**संजय मंगला गोपाळ**/ ३

विषेश/स्वामी विवेकानंदांचे शिकागो धर्म परिषदेतील ऐतिहासिक भाषण/**स्वामी विवेकानंद**/ ५

विषेश/घटनेतील परिशिष्ट नऊ बद्दलचे भावानिक नरेटिव्ह!/**सतीश देशमुख**/ ६

स्त्री मुक्ती परिषद/स्त्रीवादी परिवर्तनासाठी पितृसत्तेविरोधातील समुदायांची मोट/**प्रा. संगीता जोशी**/ ८

टिप्पणी/देवणहळ्ळीतील भू - संपादन प्रक्रिया पूर्णत: रद्द/**NAPM**/ १०

टिप्पणी/गडचिरोली रक्तबंबाळ होत आहे: खाण प्रकल्पांची आक्रमणे थांबवा/ **गडचिरोली बचाओ मंच** / १३

टिप्पणी/जन सुरक्षा विधेयक: हुकूमशाहीचा संविधानबद्ध अध्याय/**सुनील मनवर**/ १४

टिप्पणी/पॅलेस्टाइनला मदत करणाऱ्यांची सुटका करण्याचे आवाहन/**NAPM**/ १६

राजकारण/विकासाबाबत सत्ताधाऱ्यांच्या पोकळ वल्गना!/**आ. श्री. केतकर**/ १७

श्रमिक जगत/गिग कामगारांची असहायता/**नीलांबरी जोशी**/ २०

चर्चा/भावांचे ऐक्य.../**सुनील सांगळे**/ २२

जगभर/राजकीय भूकंप आणणारा तिशीचा तरुण/**डॉ. प्रदीप आवटे**/ २४

टिप्पणी/गांधीवादी संस्थांवर मुख्यमंत्र्यांचे बेछूट आरोप/ २५

आघाडीवर/वारीतील पुरोगामींबद्दल अफवा पसरवणे थांबवा!/**शामसुंदर महाराज सोन्नर**/ २६

आघाडीवर/जनसुरक्षा कायद्याला राज्यपालांनी मंजुरी देऊ नये/**जनसुरक्षा विधेयकविरोधी संघर्ष समिती**/ २८

आघाडीवर/सरकारी रुग्णालयांच्या खासगीकरणास प्रचंड विरोध/**NAPM**/ २९

आघाडीवर/९ जुलैच्या देशव्यापी कामगार संपात संपूर्ण सहभाग/**NAPM**/ ३१

वृत्तांत/जन आंदोलनांच्या राष्ट्रीय समन्वयाचे कार्यकर्ता संवाद शिबिर/**वैभवी आढाव**/ ३३

कृपया वर्गणीचे दर वाढविण्यात आलेले आहेत

कार्यकर्ते/विद्यार्थ्यांना वर्गणीत सवलत मिळू शकेल.
खाली दिलेल्या ईमेल किंवा मोबाईलवर सवलतीसाठी संपर्क साधा.
आंदोलन शाश्वत विकासासाठीची वर्गणी भरा आता ऑनलाईन!

Name of A/c.: Andolan Shashwat Vikasasathi
Bank Of India, Naigaum Cross Road Branch, Dadar (East), MUMBAI 400014. Current A/c No.: 003520110001099, IFSC: BKID0000035

वर्गणी ऑनलाईन जमा केल्यानंतर खाली दिलेल्या ईमेल किंवा मोबाईलवर मेसेज करून लागलीच कळवा! ईमेल : andolan.magazine@gmail.com **मोबाईल : 9869984803/ 9869392013/ 7045003640**

जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय - मराठी संवाद माध्यमाचा अंक - वर्ष २९ अंक ८

कार्यालय : आंदोलन शाश्वत विकासासाठी, द्वारा केमिकल मजदूर सभा, २९-३०, पहिला मजला, ए विंग, हाजी हबीब बिल्डिंग, नायगांव क्रॉस रोड, दादर (पूर्व), मुंबई - ४०००१४.

वार्षिक वर्गणी - व्यक्ती - रु. ३००/- संस्था - रु. ४००/-
१२ वर्षांची वर्गणी - व्यक्ती रु. ३,०००/- संस्था - रु. ४,०००/-

• आपण एकाहून अधिक वर्षांसाठी वर्गणी भरू शकता. • चेक/ड्राफ्ट 'आंदोलन शाश्वत विकासासाठी' ह्या नावाने काढावा. • वर्गणी शक्यतो चेक/ड्राफ्टनेच पाठवावी • तसे शक्यच नसल्यास मनिऑर्डरने पाठवावी.

• चेक/ड्राफ्ट/मनीऑर्डर ठाण्याच्या पत्त्यावरच पाठवाव्या.

संपादकीय

राज्याचा लौकिक पार धुळीस मिळवण्यास सत्ताधारी आतुर !

महाराष्ट्र राज्य केवळ नावात 'महा' आहे म्हणून नाही तर सुरुवातीपासूनच देशातील एक प्रगतीशील आणि देशाला दिशा दाखवणारे राज्य म्हणून लौकिकपात्र आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ राज्याचेच नव्हे तर देशाचे आराध्य दैवत आहे. त्या काळात, 'दिल्लीचेही तख्त राखितो, महाराष्ट्र माझा !', असा गौरव इतिहासाने पाहिलेला आहे. स्वातंत्र्यलढ्याच्या काळात महात्मा गांधी कौतुकाने म्हणत, महाराष्ट्र म्हणजे कार्यकर्त्यांचे मोहोळ! स्वातंत्र्य मिळाल्यावरही देशाच्या उभारणीच्या काळात राज्यातील नेते केंद्रात धावून जात समर्थ नेतृत्व देत, तेंव्हाही वर्णन होत असे 'हिमालयाच्या रक्षणासाठी सह्याद्री धावला !' हे व यासारखे राज्याचे गौरवशाली लौकिक पार धुळीस मिळवण्याचा जणू विडा आजच्या राज्यातील सत्ताधाऱ्यांनी उचलला असावा असे त्यांचे वर्तन व त्यामुळे राज्याची अधोगती सुरू आहे. छत्रपती शिवाजी महाराज, संत ज्ञानेश्वर यांच्यापासून सुरू असलेली महाराष्ट्राची थोर परंपरा आणि इभ्रत आजचे भ्रष्ट राजकारणी धुळीला मिळवत आहेत !

राज्याचे माजी मुख्यमंत्री, विद्यमान उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे आणि त्यांचे खासदार पुत्र डॉ. श्रीकांत शिंदे यांचे साथीदार पुण्यातील उद्योजक अमित साळुंखे यांना झारखंड मध्ये लाचलुचपत विरोधी विभागाने अटक केली आहे. छत्तीसगडच्या धर्तीवर झारखंड राज्याने आपले मद्यधोरण ठरवल्यानंतर या प्रकरणात फार मोठ्ठा करोडो रूपयांचा भ्रष्टाचार उघडकीस आला असून त्यात शिंदेंचे साथीदार सामील असल्याचे उघड झाले आहे. अर्थात यामुळे शिंदेंचे राजकीय स्थान धोक्यात येईल असे मानण्याची सध्या सोय नाही. कारण मूळ शिवसेना सोडून एकनाथराव जेंव्हा सूरत गुवाहाटी मार्गे भाजपासोबत पळून गेले, त्या आधी काही दिवस शिंदेंचा जवळचा सहायक इडीच्या अटकेत सापडला होता. शिंदेंनी त्यावेळी भाजपाच्या लॉन्ड्रीत प्रवेश करण्यास नकार दिला असता तर मात्र त्यांची जेलवारी अटळ होती. आणि राजकीय भविष्यही अंधारले असते. आता त्यांना भाजपने पावन करून घेतलेले असल्यामुळे, ते जेवढे गोत्यात जातील तेवढे मोदी–शहा–फडणविसांना त्यांना धाकात ठेवणे सोपे जाणार आहे.

दुसरे उपमुख्यमंत्री आणि पुण्याचे अनेक वर्षे पालकमंत्री राहिलेले ना. अजित पवार यांचाही विरोधकांनी राजीनामा मागितला आहे. पुण्याजवळील हिंजवडी या आयटी क्षेत्रातील उद्योगांसाठी प्रसिद्ध असलेल्या भागास आता पार भकास स्वरूप येण्यास हेच पवार जबाबदार आहेत, असा त्यांच्यावर आरोप आहे. अर्थात ७०,००० करोड रुपयांच्या सिंचन घोटाळ्याचे डाग भाजपाच्या वॉशिंग मशीन मध्ये अवघ्या चार दिवसात साफ करून मिळालेले असल्यामुळे, आयटी उद्योग पुण्याहून बंगळुरुकडे जात असले तरी पवार सेफच राहणार. आणि मा. मुख्यमंत्र्यांच्या सुजाण पत्नी, 'राज्याने वेश्या धंद्याला एक व्यवसाय म्हणून मान्यता द्यावी, त्या व्यवसायाला 'dignity' मिळवून द्यावी', अशी मागणी करतात त्याबद्दल शासनाचे धोरण काय असे पत्रकाराने नम्रपणे विचारताच, चिडून प्रश्न टाळणारे मुख्यमंत्रीही आपल्या टीमसोबत राज्याची इज्जत धुळीला मिळवत राहणार !

महिला व बालविकास मंत्री ना. आदिती तटकरे सांगतात, "२ कोटी ५१ लाख ३४ हजार पैकी सुमारे २६.३४ लाख लाभार्थी अपात्र असताना देखील लाडकी बहीण योजनेचा लाभ घेत आहेत. यात काही लाभार्थी एकापेक्षा जास्त योजनांचा लाभ घेत असल्याचे, काही कुटुंबामध्ये २ पेक्षा जास्त लाभार्थी असल्याचे, तर काही ठिकाणी पुरुषांनी अर्ज केल्याच्या बाबी निदर्शनास आल्या आहेत. या माहितीच्या आधारे जून २०२५ पासून या २६.३४ लाख लाभार्थींचा लाभ स्थगित करण्यात आला आहे. निवडणुकीत लाभासाठी घाईघाईने सुरु केलेल्या या योजनेतील भ्रष्टाचारासही भाजपा आणि त्यांचे मित्रपक्षच जबाबदार आहेत.

उजव्यांच्या या राज्य विकून खाण्याच्या राजकारणाच्या विरोधात लोकशाही पद्धतीने लढणार ते संविधानवादी, लोकशाहीवादी, डावे जनसंघटना व पक्षच. मात्र राज्यातील बहुसंख्य संवेदनशील नागरिक, समाजसेवी संस्था संघटना, लोकांच्या प्रश्नांवर सनदशीर मार्गाने काम करणाऱ्या जन आंदोलनकारी संघटना, पत्रकार, विचारवंत

आदींचा प्रखर विरोध असतांनाही, बहुचर्चित असा जन सुरक्षा कायदा संबंधित नागरिकांची जनसुनवाईची मागणी धुडकावून लावत, एकतर्फी पद्धतीने व जबरदस्तीने विधानसभेत पारित करण्यात आला आहे. महिलांची सुरक्षा, बेरोजगारीला प्रभावी अटकाव, शेतकऱ्यांची कर्जमाफी या तातडीच्या प्रश्नावर मात्र विधीमंडळ अधिवेशन काळात मौनच राहिले!

राज्यातील बहुसंख्य जनता शेती वा शेतीशी संबंधित बाबींवर अवलंबून आहे. देशात आणि राज्यात शेतकऱ्यांचे अनेक जिव्हाळ्याचे प्रश्न प्रलंबित आहेत. राज्यात रोज सरासरी ८ शेतकरी आत्महत्या करत आहेत. अशावेळी राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे हे वारंवार अयोग्य वक्तव्य व वर्तन करतांना आढळत आहेत. एका विडिओ नुसार सदर मंत्री महोदय प्रत्यक्ष विधिमंडळ सभागृहात कामकाज सुरु असताना मोबाइल वर रमी खेळत होते. मंत्री महोदयांनी या प्रकरणाचा जो खुलासा केलाय तो चीड आणणारा आहे. त्यांनी मखलाशी अशी केलीये की मी कामकाजासाठी मोबाइल उघडला त्यावेळी रमीचे ॲप उघडले गेले. ते मी बंद करत असतांनाचा तो विडिओ असावा! प्रत्यक्षात तो विडिओ नीट पाहीला तर कोकाटे साहेबांच्या हातातील मोबाईलमध्ये रमीचा खेळ व्यवस्थित सुरू असल्याचे आणि ते खेळत असल्याचे स्पष्ट दिसत आहे.

राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या मातोश्री आणि 'ढसा ढसा' फेम माजी मंत्री रामदास कदम यांच्या पत्नी ज्योति कदम यांच्या नावे असलेल्या मुंबईतील कांदिवली येथील सावली बार अँड रेस्टॉरंटमध्ये अनधिकृतरीत्या सुरू असलेल्या डान्सबारचा मुद्दा विधिमंडळात उपस्थित झाला. Conflict of interest च्या तत्त्वानुसार, ज्या खात्याचे मंत्री त्यांच्याच अंतर्गत व्यवसाय करण्यास संबंधित मंत्र्यांना व त्यांच्या नजीकच्या नातेवाईकांना अनुमती नाही. पोलिसांना त्या ठिकाणी अश्लील नृत्य सुरू असल्याचे आढळले. नाचणाऱ्या महिलांवर लाखो रूपयांचा दौलतजादा उधळला जात होता. अश्लील हावभाव केले जात होते. महिलांची प्रतिष्ठा जपण्याच्या राज्यातील कायद्यानुसार या सगळ्याला बंदी आहे. माजी मंत्री रामदासभाई कदम यांनी चुकीचा खुलासा केलाय की सदर हॉटेल त्यांनी कंत्राटदाराला चालवायला दिले आहे. जरी ते खरे असले तरी कायद्यानुसार यामुळे मूळ मालकाची जबाबदारी संपत नाही.

आमदार निवासाच्या उपहारगृहात सत्ताधारी पक्षाचे आमदार संजय गायकवाड यांनी त्यांना निकृष्ट दर्जाचे जेवण पुरवले या सबबीखाली उपहारगृह कर्मचाऱ्यांना जाब विचारण्याच्या नावाखाली केलेले उद्धट वर्तन अश्लाघ्य होते. उपहारगृह व्यवस्थापकाच्या निष्काळजीपणा बाबत, अयोग्य अन्नपुरवठा केल्याबद्दल रीतसर कायदेशीर कार्यवाही करण्याचा सनदशीर मार्ग सोडून त्यांनी कर्मचाऱ्यांना, 'चड्डी-बनियान' टोळीला साजेशी मारहाण केली. कायदेमंडळात बसून कायदे करणाऱ्या सदस्यानेच कायदा हाती घेणे लोकशाहीला मारक आहे.

प्रत्यक्ष विधिमंडळाच्या प्रांगणात झालेली मारामारी अशोभनीय म्हणावी लागेल. सत्ताधारी पक्षाचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी आपल्या वैयक्तिक खुन्नसच्या पोटी विधानभवना समोरील रस्त्यावरून चाललेल्या आमदार जितेंद्र आव्हाड आणि त्यांना भेटायला आलेल्या अन्यायग्रस्त दिवंगत संतोष देशमुख यांचे बंधु धनंजय देशमुख यांना गाडीच्या दरवाज्याचा धक्का देत कळ काढली. याबाबत पत्रकारांनी नंतर छेडल्यावर, 'गाडीच्या वाटेत आले तर असे होणारच', असे पडळकरांनी हसत हसत सांगितले. अधिवेशन संपायच्या आदल्या दिवशी विधानभवनाच्या आवारातच भाजपाचे आमदार पडळकर यांचे कार्यकर्ते ऋषिकेश उर्फ सर्जेराव बबन टकले व त्यांच्या सहकाऱ्यांनी राष्ट्रवादी (शप) पक्षाच्या नितिन देशमुख व त्यांच्या सहकाऱ्यांना गाठून चक्क हाणामारी केली. यात नितीन देशमुख यांचा शर्टही फाटला. या मारामारीच्या वेळी आमदार पडळकर घटनास्थळी उपस्थित होते. त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना आवरले नाही, उलट एक प्रकारे प्रोत्साहनच दिले. त्यांच्या कार्यकर्त्यांवर खुनाचा प्रयत्न, महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण (मकोका) कायद्याखाली गंभीर गुन्हे दाखल आहेत. तरीही नंतर अटक झालेल्यात मारहाण करणारा भाजपा समर्थक फक्त एक आणि मार खाणारे विरोधकांचे पाच लोक होते! भाजपा समर्थक अट्टल गुंडाला पोलिस कोठडीत एक पोलीसच तंबाखू मळून देताना दिसला!! याचा अर्थ, सरकार आणि प्रशासन यंत्रणा मारेकर्यांसोबत असल्याचे दिसून आले.

राज्यातील अनेक आजी माजी मंत्री-आमदार राजकारणी, उच्चपदस्थ शासकीय अधिकारी अशी ७२ तथाकथित उच्चभ्रू मंडळी अडकली असलेले हनीट्रॅपचे प्रकरण

(पान १२ वर)

विशेष

स्वामी विवेकानंदांचे शिकागो धर्म परिषदेतील ऐतिहासिक भाषण

स्वामी विवेकानंद

स्वामी विवेकानंद यांनी अमेरिकेत शिकागोमधील धर्म परिषदेत केलेल्या भाषणाला पुढील महिन्यात १३२ वर्षं पूर्ण होतील. ११ सप्टेंबर १८९३ रोजी स्वामी विवेकानंद यांनी हे भाषण केलं. या भाषणानं त्यांना आणि भारतालाही एक वेगळी ओळख मिळवून दिली. (हिंदू) जगातील प्रत्येक धर्माचा सत्य म्हणून स्वीकार करतो, असं त्या भाषणात सांगणाऱ्या स्वामीजींचे सांप्रदायिकता, धर्मांधता, हिंसाचार याबाबतचे परखड विचार आजही दिशादर्शक आहेत. स्वामी विवेकानंदांचं ते भाषण...

अमेरिकेतील माझ्या भगिनींनो आणि बंधूंनो,

आपल्या प्रेमळ व उत्स्फूर्त स्वागतानं माझं हृदय भरून आलं आहे. या स्वागताबद्दल मी जगातील सर्वांत प्राचीन परंपरेच्या वतीनं आपले आभार मानतो. सर्व धर्मांची जननी असलेल्या, सर्व जाती, पंथांच्या लाखो, करोडो हिंदूंच्या वतीनं आपल्याला मन:पूर्वक धन्यवाद देतो. पूर्वेकडील देशांकडून सहिष्णूतेचा विचार जगाला मिळाला आहे.

जगाला सहिष्णुता व सर्वसमावेशकतेचा संदेश देणाऱ्या धर्माचा एक भाग असल्याचा मला अभिमान आहे. आम्ही केवळ सर्वसमावेशकता आणि सहिष्णूतेवरच विश्वास ठेवतो असं नाही, तर जगातील प्रत्येक धर्माचा सत्य म्हणून स्वीकार करतो. जगाच्या पाठीवरील सर्व देशांतील आणि धर्मांतील पीडित व गांजलेल्या लोकांना आश्रय देणाऱ्या राष्ट्राचा नागरिक असल्याचा मला अभिमान आहे. रोमन हल्लेखोरांनी ज्यांच्या धर्मस्थळांची तोडफोड केली, त्या इस्रायलींनीही दक्षिण भारतातच आश्रय घेतला होता. त्या सर्वांच्या स्मृती आम्ही आमच्या हृदयात आजही जपून ठेवल्या आहेत. महान पारशी धर्माच्या लोकांना शरण देणाऱ्या आणि आजही त्यांचं पालन–पोषण करणाऱ्या धर्माचा मी एक भाग आहे, याचाही मला सार्थ अभिमान आहे.

बंधूंनो, लहानपणापासून मी ऐकलेल्या आणि मुखोदगत केलेल्या एका श्लोकाच्या ओळी आपल्याला ऐकवण्याची माझी इच्छा आहे. कोट्यवधी लोक आजही या ओळींचं पारायण करतात– 'ज्याप्रमाणे वेगवेगळ्या नद्या वेगवेगळ्या ठिकाणी उगम पावून अखेरीस समुद्राला जाऊन मिळतात, त्याचप्रमाणे माणूस आपल्या इच्छेनुसार वेगवेगळे मार्ग निवडतो. हे मार्ग सरळ असो की वाकडे–तिकडे, ते शेवटी भगवंतापर्यंतच जातात.

आजची ही पवित्र परिषद 'भगवद्गीते'मधील पुढील सिद्धान्ताचाच पुरावा आहे. तो असा – 'जो माझ्यापर्यंत येतो, तो कसाही असो, मी त्याचा स्वीकार करतो. कुणी कुठलाही मार्ग निवडो, अखेरीस माझ्यापर्यंतच येतो.'

सांप्रदायिकता, कट्टरता, कर्मठता आणि धर्मांधतेनं ब्रयाच काळापासून पृथ्वीला आपल्या पंजात जखडून टाकलं आहे. या सर्वांनी पृथ्वीला हिंसाचारानं माखून टाकलं आहे. अनेकदा ही पृथ्वी रक्तानं लाल केली आहे. कितीतरी संस्कृतींचा नाश केला आहे आणि कितीतरी देश गिळून टाकले आहेत. हे राक्षस नसते तर मानवसमाज आज कितीतरी विकसित झाला असता. मात्र, आता या राक्षसांचे दिवस भरले आहेत. मला विश्वास आहे ही परिषद सर्व प्रकारची धर्मांधता, सर्व प्रकारच्या वेदना (मग त्या तलवारीच्या असोत की लेखणीच्या) आणि माणसा-माणसांमधील सर्व प्रकारच्या दुर्गुणांचा संहार करेल.

('अक्षरनामा'च्या सौजन्याने)

विचार वेधला (Vichar Vedh) सोशल मीडिया अधिकारी स्त्री नेमणे आहे.

काम पूर्णवेळ, मानधन रुपये पंचवीस हजार प्रति महिना.
कार्यस्थळ: अथश्री, बाणेर पाषाण लिंक रोड, पुणे.
सामाजिक काम करू इच्छिणाऱ्या 40 ते 50 वर्षे वयोगटातील स्त्रीने संपर्क करावा.

सरिता आवाड : 9833987568
इ मेल: sarita.awad1@gmail.com
आनंद करंदीकर : 9604518539
इ मेल: anandkrandikar49@gmail.com

विशेष

घटनेतील परिशिष्ट नऊ बद्दलचे भावानिक नरेटिव्ह!

सतीश देशमुख

परिशिष्ट नऊ बद्दलचे समज, गैरसमज व वास्तव मी खालील लेखात मांडले आहेत.

26 जानेवारी 1950 रोजी राज्यघटना स्वीकारली गेल्यानंतर अवघ्या दीड वर्षात 18 जून 1951 ला निर्वाचित नव्हे तर काळजीवाहू हंगामी सरकारने पहिली घटना दुरुस्ती केली. अजून पहिल्या सार्वजनिक लोकसभा निवडणूका व्हायच्या होत्या. त्यानुसार अनुच्छेद 31 (अ) व (ब) तसेच परीशिष्ट 9 जोडण्यात आले. त्या नुसार परीशिष्ट 9 मधील समाविष्ट कायद्यांच्या विरोधात न्यायालयात जाता येणार नाही अशी ती तरतूद आहे. ह्या नादुरुस्ती मुळे मूलभूत हक्काला धक्का पोहचत असल्यामुळे काही संघटना शेतकऱ्यांच्या पारतंत्र्याची सुरुवात झाल्याच्या निषेधार्थ 18 जून हा काळा दिवस म्हणून पाळतात.

तर ह्या संदर्भातील गाजलेल्या ऐतिहासिक निवाड्यांबद्दल माहीती घेऊया. त्या निमित्ताने असेही निर्णय झाले की सरकार हे संविधाना पेक्षा श्रेष्ठ नाही.

प्रथम मी हे स्पष्ट करू इच्छितो की पहिली घटना (ना)दुरुस्ती व परिशिष्ट नऊ मधील टाकलेले शेतकरी विरोधी कायदे ही निषेधार्थ गोष्ट आहे. त्यामुळे मूळ घटनेतील तरतुदीचा संकोच होतो. ते रद्द झालेच पाहिजे.

1) मी बऱ्याच लेखांमध्ये वाचले आहे, नेत्यांच्या भाषणात ऐकले आहे की, ``परिशिष्ट नऊ मध्ये एकूण 284 कायदे आहेत. त्यापैकी 250 कायदे शेती संदर्भात आहेत''. पण वस्तुस्थिती काय आहे?

परिशिष्ट नऊ मध्ये फक्त दोन महत्वाचे शेतीशी निगडित कायदे आहेत. महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा), अधिनियम 1961 आणि आवश्यक वस्तू कायदा, 1955.

शेतजमीन (परिशिष्ट 7 प्रमाणे), हे राज्याच्या यादीमध्ये असल्याने प्रत्येक राज्याने परिशिष्ट नऊ मध्ये आपापले जमीन विषयक कायदे टाकले आहेत, ते त्या त्या राज्यांना लागू आहेत. त्यामध्ये बिहार, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, पश्चिम बंगाल, आंध्र प्रदेश, आसाम, ओरिसा, गुजरात, केरळ, गोवा, राजस्थान वगैरे तसेच बॉम्बे, हैदराबाद, मद्रास, म्हैसूर पण. एकतर त्यामुळे यादी वाढली आहे.

शिवाय वेळोवेळी कायद्यात झालेले बदलही (Amendments) त्यात टाकले आहेत. उदाहरणार्थ, महाराष्ट्राने कमाल जमीन धारणा कायद्यात 9 वेळा बदल केलेत, ओरिसाने 10 वेळा बदल केलेत, वगैरे. त्यामुळे कायद्यांची संख्या मोठी झाली आहे.

ह्यातील बरेच कायदे शेतीशी संबंधित नाहीत. जसे माईन्स आणि मिनरलस, जनरल इन्शुरन्स, चिट्टी कायदा, कॉपर कॉर्पोरेशन, परकीय चलन, स्मगलिंग, वेठबिगार पद्धत (निर्मूलन) अधिनियम वगैरे.

महत्वाचा 'भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013' (LARR) हा कायदा परिशिष्ट नऊ मध्ये नाही. तसेच शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण व स्वातंत्र्य संकोच करणारे इतर विरोधी कायदे ह्यामध्ये नाहीत.

थोडक्यात वरील विधाने ही 'भावानिक नरेटिव्ह' चा भाग आहेत.

2) परिशिष्ट नऊ मधील समाविष्ट असलेल्या कायद्या विरुद्ध न्यायालयात दाद मागता येते का?

a) गोलकनाथ निवाड्यानुसार (1967) 'संसदेला भारतीय संविधानाच्या मूलभूत अधिकाराला (Fundamental Rights) बाधा आणणारे कायद्यातील बदल करण्याचा अधिकार नाही' असा आपल्याला अनुकूल असा ऐतिहासिक निर्णय दिला होता. त्यामुळे आपल्याला न्यायालयात दाद मागण्याचा थोडा मार्ग सापडला होता.

b) परंतु केशवानंद भारतीच्या केसमध्ये (1973) सर्वोच्च न्यायालयाच्या 13 न्यायधिशांच्या खंडपीठाने वरील निकाल रद्द करून असा निकाल दिला की कायद्यामुळे

''संविधानाच्या मूलभूत संरचनेला'' (Basic Structure) धक्का पोहचत असेल तरच आव्हान देता येईल. ही एक नवीन संकल्पना होती. परंतु घटनेमध्ये 'मूलभूत संरचने' चा सिद्धांत (Doctrine) कुठेही उल्लेख नसल्यामुळे त्याबाबत स्पष्टता नाही, तर संधिग्नता आहे.

c) मनेका गांधीच्या केसबाबत (1978) निकाल देताना, सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते की कलम 14 (कायद्यापुढे समानता), 19 (स्वातंत्र्याचा हक्क) आणि 21 (जीवीत व व्यक्तिगत स्वातंत्र्य) हे स्वतंत्रपणे वाचता येणार नाही. ते एकमेकांशी संबंधित आहेत आणि ''सुवर्ण त्रिकोण'' (Golden Triangle) आहेत. ह्या निवाड्याचा परिशिष्ट नऊ शी प्रत्यक्ष संबंध नाही, फक्त माहितीस्तव.

d) आय. आर. कोएल्होच्या (2007) केसमध्ये 9 न्यायधिशांच्या खंडपीठाच्या निकालानुसार परिशिष्ट नऊ मधील समाविष्ट असलेल्या कायद्या विरुद्ध न्यायालयात जाता येईल जर, ते कायदे 24 एप्रिल 1973 नंतर अस्तित्वात आले असतील तर. (इथे परिशिष्ट मध्ये कधी टाकले ह्याचा काही संबंध नाही). आणि जर त्या कायद्याने घटनेतील कलम 14, 19 व 21 ह्या तिन्हीचे उल्लंघन केले असेल तरच.

ही फार अवघड टेस्ट आहे. कारण इकॉनॉमिकल पॉलिसी बाबत कलम 21 ला धक्का लागत असला तरी कोर्ट ते रिजेक्ट करते असे अनेक निकाल आहेत.

e) सोप्या भाषेत, कागदावर जरी असे दिसत असले की न्यायालयात दाद मागण्याची तरतूद आहे, पण प्रत्यक्षात ती तकलादू, अशक्यप्राय आहे. ह्या कायद्यांवर न्यायिक पुनरावलोकन करता येणार नाही, अश्याच अटी आहेत.

f) परंतु ह्या कायद्यातील तरतुदीची अंमलबजावणी करताना जर अनियमितता आढळली, किंवा कोणावर अन्याय झाला तर नक्कीच कोर्टात दाद मागता येते. माझ्याकडे आवश्यक वस्तू अधिनियम पुस्तक आहे. ज्यात अश्या शेकडो केसेस व त्यांचे निकाल दिलेले आहेत.

3) फक्त जवाहरलाल नेहरूंना टार्गेट करणे योग्य आहे का?

हंगामी पंतप्रधान असताना पहिली घटना दुरुस्ती करण्याचा त्यांना नैतिक अधिकार नव्हता. नंतरच्या काळात झालेल्या घटनात्मक मोडतोडीचा पाया त्यांनी घातला ही त्यांची चूकच आहे. त्या वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कायदा मंत्री होते.

त्यावेळी आपल्या भाषणात नेहरू म्हणाले होते की आम्ही मोठया समाधानाने किंवा आनंदाने हे करत नाही, ह्या मध्ये फक्त 13 कायदे समाविष्ट केले आहेत, त्यानंतर त्यात भर घालू इच्छित नाही.

त्या काळात मोठ्या प्रमाणात जमीनदारी, वतनदारी व त्यासारख्याच इतर राज्यातील तालुकादारी, मालगुजारी, महालवारी अस्तित्वात होत्या. मोजक्या लोकांकडे शेकडो एकर जमिनी होत्या. (उदा. याचिककर्ता गोलकनाथ फॅमिलीकडे 500 एकरच्या वर जमीन होती). त्यामुळे कृषि उत्पादकता व सुधारणेला (Agrarian Reform) बाधा येत होती. प्रत्यक्ष शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना जमिनीची मालकी देण्यात अडथळे येत होते. त्यांच्या कडून 50% च्या वर सारा वसूल केला जात होता. पण ह्या बदलामुळे खंडाने किंवा भाडेतत्वावर कसणारे 2 कोटीच्या वर भूमिहीन हे शेतमालक झाले. त्यांचा शेतसारा नगण्य झाला.

त्या काळातील आव्हाने वेगळी होती. तरीही नेहरूनी घाई न करता, जमीनदारी निर्मूलनासाठी वेगळा कायदा करता येईल का ह्याचा पर्यायी विचार करायला हवा होता.

इतिहासात त्या वेळेच्या तत्कालीन परिस्थितीमध्ये घेतलेल्या निर्णयाची आजच्या परिस्थितीमध्ये मूल्यांकन करून त्यांना पूर्णत: दोषी ठरवणे योग्य होणार नाही. त्यानंतर सात राजकीय पक्षांची सरकारे आली, 13 पंतप्रधान झालेत, त्यांनी याकडे लक्ष दिले नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे या दुर्देशेला सगळेच राज्यकर्ते दोषी आहेत.

आता जमीनदारी कालबाह्य झाली आहे, उत्पादकतेमध्ये किती तरी पिकांमध्ये भारत जगात एक किंवा दोन क्रमांकावर आहे. त्यामुळे आता परिशिष्ट नऊ तातडीने रद्द करण्याची गरज आहे.

(लेखक मेकॅनिकल इंजिनियर असून शेतकरी आणि एकात्मिक ग्रामीण विकासाचा एकच ध्यास असलेले, फोरम ऑफ इंटलेकच्युअल्सचे अध्यक्ष आहेत.)

deshmukhsk29@gmail.com

स्त्रीवादी परिवर्तनासाठी पितृसत्तेविरोधातील समुदायांची मोट

प्रा. संगीता जोशी

स्वायत्त स्त्री चळवळीच्या ५० व्या वर्षात महाराष्ट्रातील स्त्रियांच्या प्रश्नांवर काम करणाऱ्या संघटना, कार्यकर्ते एकत्र येऊन 'महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषद समाजाच्या स्त्रीवादी परिवर्तनासाठी' या मंचाची स्थापना केली. स्त्री चळवळीच्या अर्धशतकी वाटचालीचा लेखाजोख मांडणे, वर्तमानातील आव्हाने आणि भविष्यातील दिशा यावर विचारमंथन सुरु आहे. विविध कार्यक्रम आणि मोहिमा हाती घेतल्या आहेत. पितृसत्ता जातीवादातून, धर्मांधतेतून आणि भांडवलशाहीतून विषमता पोसत आहे. त्यामुळे जातीअंताचा व लिंगभावी (जेंडर) शोषणाच्या अंताचा लढा देणारे आणि धार्मिक वर्चस्ववाद व भांडवलशाहीला विरोध करणारे सर्व स्त्रीवादी आहेत. या लढ्यातील लोक वेगवेगळे आहेत, त्यांचे मुद्दे वेगळे आहेत आणि लढ्याची पद्धत ही वेगळी आहे तरीही आम्ही सारे एकत्र आहोत. या निश्चयाने परिषदेच्या मंचावर विविध समुदायांना सामील करून घेण्यासाठी बैठका आयोजित करत आहोत.

कामगार संघटनांसोबत बैठक

विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून कामगार चळवळीत सामील झालेल्या महिला कामगारांनी समान कामाला समान वेतन, कामाची वेळ आठ तास, बाळंतरजा, मुलांसाठी पाळणाघरे या मागण्यांसाठी लढे दिले. महाराष्ट्रातील स्त्री चळवळ कामगार संघटना, डावे पक्ष, शेतमजूर संघटना आणि दलित पँथर यांच्या आधाराने उभ्या राहिल्या. कामगार संघटनांबरोबर महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषदेची पहिली बैठक श्रमिकवर झाली. या बैठकीत AITUC, HMS, विडी कामगार संघटना, MSEB कर्मचारी संघटना, भारतीय महिला फेडरेशन, सर्व श्रमिक संघ, कामगार एकता कमिटी, पुरोगामी महिला संघटन, Bank of Maharashtra Employee Union /MSBEF, मुंबई महानगरपालिका कचरा वाहतूक यूनियन या संघटनांचे २५ कार्यकर्ते मिटिंगमध्ये सहभागी झाले होते. साथींनी त्यांचे प्रश्न मांडले. उजव्या विचारांच्या प्रतिगामी मोदी सरकारकडून गेल्या ११ वर्षात कामगार, कर्मचाऱ्यांच्या हक्कांची पायमल्ली सुरु आहे. ८०% स्त्रिया असंघटीत रोजगार क्षेत्रात फेकल्या गेल्या आहेत. कामगार चळवळ वेगवेगळ्या राजकीय विचारसरणीमध्ये विभागली गेली आहे. स्त्रीवादी ज्याप्रमाणे राजकारण डोक्यात ठेवून व्यवहारात स्त्री मुक्तीच्या विचारावर एकत्र आल्या आहेत त्याप्रमाणे एका पक्षाच्या छत्राखाली तसेच एका व्यवसायातील सर्व युनियननी एकत्र येण्याची वेळ आली आहे. आदिवासी शेतकरी, ऊसतोडणी कामगारांचे प्रश्न मांडले. ग्रामीण महिलांना ही पाळणघराची गरज, त्यांना गुरांसाठी ही पाणी वाहून आणावे लागते यासारख्या समस्या मांडल्या.

महिला युनियनची यादी करून सगळ्यांना जोडून घ्यावे, कामगार, कर्मचारी, कष्टकरी महिलांची परिषद भरवून त्यांचा जाहीरनामा बनवून त्यावर पुढे काम करत राहूया असे सुचवण्यात आले. कामगार संघटनातील स्त्रियांची ऑगस्ट महिन्यात 'स्त्री मुक्ती कार्यशाळा' आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

पारलिंगी, क्विअर समुदाय सोबत बैठक

पितृसत्ता केवळ स्त्रियांनाच दुय्यम स्थानावर लोटत नाही तर भिन्न लैंगिक ओळख असणाऱ्या व्यक्तींना ही समाजात समान स्थान देत नाही. त्यांचे सांविधानिक हक्क नाकारते. LGBTQI+ समुदायातील कार्यकर्त्यांना समाजाच्या स्त्रीवादी परिवर्तनाच्या लढ्यात स्त्रियांच्या बरोबर घेवून हा लढा अधिक बळकट होणार आहे याची जाणीव झाली. LGBTQI+ समुदायातील व्यक्तींचे विचार, अनुभव आणि प्रश्न समजून घेण्यासाठी महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषदेने दहत्व्हा संवाद आयोजित केला. पारलिंगी स्त्री, पारलिंगी पुरुष, जेंडर क्वियर, बायसेक्शुअल, पारलिंगी लैंगिक कामगार, लेस्बियन स्त्री, सीस जेंडर गे अशा विविध लैंगिकतेच्या छटा असणाऱ्या व्यक्तींनी त्यांचे विचार अत्यंत मोकळेपणाने मांडले.

दोन संरचना पितृसत्ता टिकवून धरतात. एक, जन्माला येणाऱ्यात दोनच लिंग संभवतात आणि दुसरे, लैंगिकता फक्त भिन्न लिंगात असू शकते. याव्यतिरिक्त असणाऱ्या असंख्य व्यक्ती या गुन्हेगार आहेत असे मानून त्यांना सामान्य जीवन जगण्याचा हक्कच नाकारला जातो. गेल्या दहा वर्षात निदान कायद्याने त्यांच्यावरील गुन्हेगारीचा शिक्का पुसला. दोन प्रौढ व्यक्तींमधील मर्जीच्या लैंगिक संबंधांना कायद्याने मान्यता दिली. पण समाजाने त्यांना अजूनही त्यांचा सन्मानाने जगण्याचा हक्क

मान्य केलेला नाही. त्यांचे आईबापच त्यांना दूर लोटतात. स्वत:च्या घरात त्यांच्यावर अत्याचार होतात. ते जन्म घर, गाव, नाव, वारसा हक्क या सर्वाला पारखे होतात. शिक्षण बंद होते, नोकरी नाही यामुळे आर्थिक कुचंबणा होते. जन्माचा दाखला, आधार कार्ड, राहायला घर मिळत नाही. पारलिंगी व्यक्तींना आरोग्य सेवा मिळणे मुश्कील होते.

जन्म होतो तेव्हा जननेंद्रिय पाहून बाळाचे लिंग ठरवले जाते. त्या नंतर स्वत:च्या भिन्न लैंगिक ओळखीची जाणीव होते. पण त्या वेळी आजूबाजूला समजून घेणारे आणि समजावून सांगणारे ही कोणी नसते. मानसिक गोंधळ, आई-वडिलांकडून होणारा तिरस्कार, छळ, हिंसा, अन्याय, लैंगिक अत्याचार हे सर्व सहन करून ही स्वत:च्या निराळे पणाला या व्यक्ती जपतात. त्यासाठी वैचारिक स्पष्टता, प्रचंड धैर्य आणि लढण्याची ताकद त्यांच्यापाशी आहे.

निरनिराळ्या लैंगिक ओळखींना सामावून घेणारी भाषा त्यांना हवी आहे. संविधानाचा त्यांना मोठा आधार वाटतो. समन्याय आणि संरक्षण देणारे कायदे त्यांना हवे आहेत. केवळ एका अवयवावरून माणसाचे स्थान ठरवणाऱ्या व्यवस्थेला आव्हान दिले पाहिजे असा त्यांचा निर्धार आहे. म्हणूनच पितृसत्ते विरोधात लढणारे सर्वच स्त्रीवादी आहेत असे ते मानतात. भविष्यात स्त्रीवादी या एका लिंगवाचक शब्दा ऐवजी सर्वसमावेशक शब्द शोधावा लागेल असे ही त्यांनी आवर्जून सांगितले.

मुस्लीम महिलांचे प्रश्न आणि अनुभव

मुस्लीम महिलां सोबतच्या दहत्ग्हा बैठकीत सावित्री-फातिमा महिला संघटना सांगली, शांतीसाठी स्त्री संघर्ष कोल्हापूर, पत्रकार हिनाकौसर, मुस्लीम सत्यशोधक मंडळ पुणे, भटके विमुक्त आदिवासी संयोजन समिती, बेबाक कलेक्टिव्ह, नारी अत्याचार विरोधी मंच, कोरो मुस्लीम महिला मंडळ, आवाज ए निस्वा, जमत ए इस्लामी हिंद नागपूर या संघटनांच्या कार्यकर्त्यांचे निवेदन मन हेलावून टाकणारे होते.

सरकारी यंत्रणांकडून आणि समाजाकडून जात, धर्म, लिंगभाव, प्रांत या मुद्द्यांवर सतत भेदभाव होत असतो. पण मुस्लिमांच्या बाबतीत होत असलेले ध्रुवीकरण हे अधिक गंभीर आहे कारण त्यामागे मुसलमानांसंबंधी जाणीव पूर्वक पसरवलेला विखारी द्वेष आहे. शासन पुरस्कृत आक्रमक राष्ट्रवाद आणि राजकीय पुढाऱ्यांची द्वेषपूर्ण भाषणे यामुळे समाजाची वीण पार उसवली आहे. लव्ह जिहाद, लँड जिहाद, UPSC अशी नवीन मांडणी लोकात व्यवस्थित पसरवली जात आहे. सरकारी दडपशाही, टेहळणी यामुळे कित्येक दशकांपासून मुस्लिम स्त्रियांमध्ये काम करणाऱ्या विविध पुरोगामी संघटनांचा आपापसातील संवाद ही तुटला आहे. समाज माध्यमातून गेल्या काही महिन्यात ९४५ हेटक्राईम नोंदवले आहेत. त्याचा परिणाम होऊन २५ जणांची हत्या आणि २५० दंगली माजल्या आहेत.

विशालगड आणि गजापूर मधील दंगली नंतर कुटुंबे विस्थापित झाली आहेत, पौडमधील सामाजिक आणि आर्थिक बहिष्कारामुळे व्यवसाय करणारे गरीब मुस्लिम देशोधडीला लागले आहेत. भटक्या-विमुक्त समाजातील मदारी समुदायाला रहिवासाचे दाखले आणि सरकारी कागदपत्रे नसल्याने बांगलादेशी घुसखोर ठरवले जात आहे. एकीकडे मुस्लीम स्त्रियांना कॉलेज पासून गल्लीपर्यंत संशयाने पहिले जाते आणि दुसरीकडे मुसलमानांकडून 'बेटी बचावो हिजाब पेहनावो'चे फतवे निघतात. मुस्लिम समाजातील स्त्रियांना शासकीय दाखले व कागदपत्र, सरकारी योजनांचा लाभ, बँकांकडून कर्ज, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देताना दिरंगाई किंवा नाकारले जाणे हे सर्रास होत आहे. मुस्लिम घटकांवरील अत्याचार व गुन्ह्याची नोंद करण्यासाठी पोलिसांकडून चालढकल होते. मुस्लिम विक्रेत्यांकडून वस्तुविकत घेऊ नका किंवा त्यांच्याशी व्यवहार करु नका असे फतवे काढणारे बोर्ड गावात लागतात. पण सामान्य हिंदू नागरिक त्याकडे दुर्लक्ष करतात असे सामाजिक सौहार्दाचे चित्र काही ठिकाणी अजून ही टिकून असल्याचे दिसते. मुस्लिम एकल महिलांची पाहणी करण्याची विनंती स्थानिक स्वराज्य संस्थांकडे केली आहे पण ती पूर्ण होत नाही. राहण्यासाठी घर, नोकरी, व्यवसाय उद्योगधंदे, शिष्यवृत्तीचे अधिकार आणि सण साजरे करणे, काय खावे, कुठे खावे असे त्यांचे सामान्य नागरी हक्क ही हिरावले गेले आहेत. मुस्लीम धर्मातील पितृसत्ते विरोधात आणि बहुसंख्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय दडपशाही विरोधात लढणाऱ्या मुस्लीम महिला संघटनांना पुरोगामी आंदोलने आणि स्त्रीवादी चळवळीचा मोठा आधार वाटत आहे.

पुढल्या महिन्यात आदिवासी, भटके–विमुक्त, पत्रकार महिला, स्त्रीवादी लेखिका, ख्रिश्चन महिला यांच्या बरोबर बैठका आयोजित करत आहोत.

(लेखिका प्राध्यापक असून स्त्री मुक्ती संघटनेच्या कार्यकर्त्या आहेत.)

streevadiparishad@msmporg.in

टिप्पणी

देवणहळ्ळीतील भू - संपादन प्रक्रिया पूर्णत : रद्द

NAPM

जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय आणि राष्ट्रीय किसान समुदाय आघाडी यांनी बंगळूरू जवळील देवणहळ्ळीतील भू- संपादन प्रक्रिया रद्द करण्याची मागणी करणारे पत्र कर्नाटकाचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांना लिहिले होते. ४ जुलै रोजी मुख्यमंत्र्यांनी त्या शेतकरी प्रतिनिधींची भेट घेतली, त्यांच्याशी चर्चा केली आणि चर्चेनंतर ती भू- संपादन प्रक्रिया पूर्णत: मागे घेतली. या निमित्ताने, सांविधानिक रित्या आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यांशी संवाद साधून त्यांच्या मागण्यांना न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करण्याची काँग्रेस सरकारची भूमिका ही भाजप सरकारच्या आंदोलन कर्त्यांकडे दुर्लक्ष करण्याच्या भूमिकेपेक्षा किती वेगळी आहे हे ठळकपणे समोर आलं आहे.

मुख्यमंत्र्यांना लिहिलेलं पत्र आणि चर्चेनंतर जाहीर झालेले निर्णय वाचकांच्या माहितीसाठी देत आहोत.

दिनांक: ३ जुलै, २०२५

प्रिय सिद्धरामय्या अवरे,

आम्ही, खाली सही करणारे, राष्ट्रीय शेतकरी समुदाय आघाडी व राष्ट्रीय लोक चळवळी आघाडी (NAPM) तर्फे आपल्याला हे पत्र लिहीत आहोत. गेले ११८५६ दिवस (३.५ वर्षे) चाललेल्या ऐतिहासिक देवणहळ्ळी जमिनीच्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, उद्या (४ जुलै) आपल्या शेतकरी प्रतिनिधींशी होणाऱ्या महत्त्वपूर्ण संवादाच्या पूर्वसंध्येला, आम्ही आपणास विनंती करतो की आपण कर्नाटकातील मेहनती शेतकऱ्यांच्या व जनतेच्या बाजूने उभे राहावे – ज्यांनी आपले सरकार सत्तेवर आणले आहे.

शेतकऱ्यांची मागणी म्हणजे देवणहळ्ळीतील १,७७७ एकर भूमीचे भू–संपादन पूर्णत: रद्द करावे – यास आमचा पूर्ण पाठिंबा आहे.

आपल्याला हे ठाऊक आहे की चन्नारायपट्टणा होबळीतील १३ गावांमधील शेतकऱ्यांनी – ज्यामध्ये महिला आणि लहान मुलं देखील आघाडीवर आहेत – आपल्या शेतजमिनी आणि भवितव्य वाचवण्यासाठी अहर्निश संघर्ष केला आहे. प्रस्तावित हायटेक डिफेन्स व एरोस्पेस पार्कसाठी सुपीक शेतभूमीचे १७७७ एकर जबरदस्तीने अधिग्रहण करण्याच्या विरोधात हा संघर्ष होता. यातील किमान ८०० पैकी एक चतुर्थांश शेतकरी सामाजिकदृष्ट्या मागासवर्गीय आहेत आणि इतर बरेच छोटे शेतकरी आहेत.

११५० दिवसांहून अधिक काळ शांततापूर्ण आंदोलन केल्यानंतर, जेव्हा शेतकऱ्यांनी २५ जून रोजी 'चलो देवणहळ्ळी' आंदोलनाचे आवाहन केले, तेव्हा त्यांच्यावर अन्यायकारक लाठीचार्ज झाला आणि अनेकांना ताब्यात घेतले गेले. तरीही त्यांनी बेंगळुरू येथील फ्रीडम पार्कमध्ये 'भूमी सत्याग्रह' सुरू ठेवला आहे, जो आता सातव्या दिवसात पोहोचला आहे. संपूर्ण कर्नाटकातील लोकसंघटना त्यांच्या समर्थनार्थ उभ्या आहेत. आम्हाला माहित आहे की, या विषयावर अभिनेता प्रकाश राज यांच्यासह एका प्रतिनिधीमंडळाने आपली भेट घेतली होती, आणि आपण ४ जुलै रोजी शेतकऱ्यांशी बैठक घेण्याचे आश्वासन दिले होते.

ह्या संपादन प्रक्रियेची सुरुवात जानेवारी २०२२ मध्ये तत्कालीन भाजपा सरकारने केली होती, कॉर्पोरेट हितसंबंधांसाठी. संपूर्ण देशभरात झालेल्या लोकचळवळीमुळेच २०१३ मध्ये UPA सरकारला 'भू–संपादन व पुनर्वसन कायदा' (ईं:) पारित करावा लागला. हे अत्यंत दु:खद आणि लाजिरवाणं आहे की काँग्रेस सरकार सुद्धा या कायद्याचे उल्लंघन करत आहे आणि भाजपा सरकारने सुरू केलेली जमीन हडप करण्याची धोरणे पुढे चालवत आहे! देवणहळ्ळीतील संघर्षामुळे सरकारला ४९५ एकरचे भू–संपादन मागे घ्यावे लागले, पण उर्वरित १,७७७ एकरसाठीची प्रक्रिया देखील रद्द करावी, ही शेतकऱ्यांची योग्य मागणी आहे.

कर्नाटक औद्योगिक क्षेत्र विकास मंडळाने (KIADB)

यापूर्वीच या परिसरात ६,००० एकर जमीन ताब्यात घेतली आहे. हे केवळ विस्थापनच नव्हे तर त्या शेतकयांना LARR कायद्यानुसार अधिकारही मिळाले नाहीत. २०२२ च्या KIADB सर्वेनुसार ८०३ शेतकरी आपल्या जमिनी द्यायला तयार नाहीत, तर मग कायद्याच्या विरोधात जबरदस्तीचे संपादन का?

आपल्या पक्षाने विरोधात असताना या विषयावर विधानसभेत आवाज उठवला होता, आपण स्वत: सप्टेंबर २०२२ मध्ये शेतकयांना भेटून आश्वासन दिले होते की सत्तेवर आल्यानंतर हे संपादन थांबवले जाईल. शेतकरी आज केवळ आपल्याला आठवण करून देत आहेत. त्यांना न्याय हवा आहे – खोटेपणा नाही, लाठ्या नाही, जमीन हडपणे नाही आणि रोजगार गमावणेही नाही.

अनेक शास्त्रज्ञ व कृषी तज्ञांनी उद्योगजगताला एक खुले पत्र लिहून शेतकयांच्या संघर्षाला पाठिंबा दिला आहे आणि प्रश्न उपस्थित केला आहे की 'विकास'च्या नावाखाली शेती, अन्नसुरक्षा नष्ट करून मूठभर भांडवलदारांचेच हित का साधले जात आहे?

देवणहळ्ळीचा संघर्ष आता निर्णायक टप्प्यावर आहे, राष्ट्रीय पातळीवर त्याला समर्थन मिळत आहे. संयुक्त किसान मोर्चाचे नेतेही आंदोलनस्थळी जाऊन पाठिंबा देत आहेत. ह्या शेतकरी आणि कामगारांच्या संघर्षामुळेच कर्नाटकात भाजपचा पराभव शक्य झाला.

त्यामुळे आम्ही आपल्याला विनंती करतो की:

१. ४ जुलै रोजी शेतकरी प्रतिनिधींसोबत न्याय्य संवाद सुनिश्चित करावा.

२. १,७७७ एकर संपूर्ण भू–संपादन प्रक्रिया त्वरित रद्द करावी.

३. कॉर्पोरेट व रिअल इस्टेट हितासाठी होणारे जमीनीचे हडपणे व उपजीविकेचा नाश थांबवावा.

४. लाठीचार्ज व अटक करणाया पोलिस अधिकायांवर कारवाई करावी आणि आंदोलकांवरील सर्व खटले मागे घ्यावेत.

५. २०१३ च्या LARR कायद्याची परिपूर्ण आणि प्रामाणिक अंमलबजावणी करावी.

६. १९७८ चा अनुसूचित जाती–जमातींच्या जमिनीच्या हस्तांतरणावरील बंदी कायदा पाळावा.

७. हरळूरू औद्योगिक क्षेत्र व KIADB प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या शेतकयांना न्याय द्यावा.

८. KIADB ने आतापर्यंत राज्यभरात घेतलेल्या व वापरलेल्या जमिनीबाबत श्वेत पत्रिका प्रसिद्ध करावी.

९. जिल्हास्तरावर प्रभावी यंत्रणा स्थापन करून शेतकरी व ग्रामीण समस्या त्वरित सोडवाव्यात.

१०. कर्नाटकातील जनचळवळींशी संवादाचे वातावरण निर्माण करावे आणि त्यांच्यावर दडपशाही थांबवावी.

बेंगळुरू व कर्नाटकाला अन्न देणाया अन्नदात्यांच्या बाजूने आपण उभे रहाल, आणि या प्रश्नाचा न्याय्य व सर्वसमावेशक तोडगा काढाल, अशी आम्हाला आशा आहे

जुलै रोजी मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या अध्यक्षतेखाली विधानसौधात देवनहल्ली तालुक्यातील चन्नारायपटणा व आजूबाजूच्या गावांतील जमीन संपादन प्रक्रियेबाबत अधिकायांशी आणि शेतकरी नेत्यांशी झालेल्या बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत खालील महत्त्वाचे निर्णय जाहीर करण्यात आले:

- *देवनहल्ली तालुक्यातील चन्नारायपटणा व आजूबाजूच्या गावांतील जमीन संपादन प्रक्रिया पूर्णत: मागे घेण्यात आली आहे.*
- सरकारने जमीन संपादन प्रक्रिया पूर्णपणे रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. तथापि, काही शेतकयांनी स्वेच्छेने आपली जमीन द्यायची तयारी दर्शवली आहे. असे शेतकरी जे जमीन देण्यास इच्छुक आहेत, त्यांच्याकडून जमीन संपादित करून त्यांना चांगली मोबदला रक्कम व विकसित भूखंड देण्यात येतील.
- या शेतकयांना मार्गदर्शक किंमतीपेक्षा जास्त मोबदला दिला जाईल. जे शेतकरी शेती सुरू ठेवू इच्छितात, ते ती सुरू ठेवू शकतील.
- देवनहल्ली तालुका बेंगळुरुजवळ असून तिथे बेंगळुरु आंतरराष्ट्रीय विमानतळ आहे. प्रत्येक नागरिकाचे उत्पन्न वाढवायचे असेल तर विकास प्रकल्प पुढे सरकणे आवश्यक

आहे. नवीन उद्योग सुरू करण्यासाठी व गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी जमीन आवश्यक आहे आणि अशी जमीन उपलब्ध करून देण्याची जबाबदारी सरकारची आहे.

● सरकारने संपादन प्रक्रिया रद्द केली असली तरी जे शेतकरी स्वेच्छेने जमीन द्यायचे ठरवतील त्यांच्याकडून ती संपादित करून त्यांना अधिक मोबदला व मोठे, विकसित भूखंड दिले जातील.

● सरकारचा 1,777 एकर जमीन संपादन करून देवनहल्ली तालुक्यात एअरोस्पेस पार्क विकसित करण्याचा मनसुबा होता. यासाठी बेंगळुरुजवळ जमीन देण्याची विनंती करण्यात आली होती.

● राज्यात इतक्या मोठ्या प्रमाणावर जमिनीच्या संपादनाला यापूर्वी कधीही असा प्रचंड विरोध झालेला नव्हता. ही जमीन सुपीक असून शेतीसाठी अत्यंत उपयुक्त आहे. स्थानिक शेतकरी मोठ्या प्रमाणावर या जमिनीवर अवलंबून आहेत. आंदोलक शेतकयांनी संपादन थांबवण्याची ठाम मागणी केली होती.

● सरकारने सर्व हितधारकांचे, विशेषत: शेतकरी आणि जमिनीचे मालक यांचे म्हणणे ऐकून घेतले. राज्याच्या विकासासाठी औद्योगिक प्रोत्साहन गरजेचे असले तरी सरकारने शेतकरीपक्षीय भूमिका घेत त्यांची मागणी मान्य केली आणि संपादन प्रक्रिया थांबवण्याचा निर्णय घेतला.

● "काही कारणांमुळे जर जमीन संपादन रद्द झालं तर हे उद्योग कदाचित इतरत्र जातील. तरीसुद्धा सरकार शेतकयांच्या पाठीशी आहे आणि हाच निर्णय घेतला आहे," असे मुख्यमंत्री म्हणाले.

● "मुख्यमंत्री महोदयांनी सामाजिक न्यायाविषयीची आपली बांधिलकी फक्त शब्दांतच नाही, तर कृतीतूनही दाखवून दिली आहे," असे अभिनेता आणि कार्यकर्ते प्रकाश राज म्हणाले.

मंत्री एम. बी. पाटील, के. एच. मुनियप्पा, एच. के. पाटील, कृष्णा बायरेगौडा, प्रियांक खडगे, बैरती सुरेश, मुख्यमंत्री यांचे राजकीय सचिव नसीर अहमद, कायदेशीर सल्लागार पोन्नण्णा, ॲडव्होकेट जनरल शशिकिरण शेट्टी, शेतकरी प्रतिनिधी आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

napmindia@gmail.com
अनुवाद: मीनल उत्तुरकर
meenalutturkar16@gmail.com

(संपादकीय: पान ४ वरुन)

तर गेली अनेक वर्षे सुरू आहे. या ट्रपमुळे जे ब्लॅकमेलिंग झाले, त्यामुळे अनेक मंत्री-अधिकाऱ्यांनी चुकीचे निर्णय घेतले. राज्याची मालमत्ता लुटली. संवेदनशील माहिती असामाजिक तत्त्वांकडे पोहोचली. भ्रष्टाचार झाला. सदनात पेन ड्राईव दाखवत विरोधकांनी आरोप करूनही, मुख्यमंत्री याबाबत सारवासारव करताना दिसले. कोणाला वाचवण्याचा प्रयत्न होतोय, हे राज्यातील जनतेला कळायलाच हवे.

थोडक्यात, संविधानाच्या संवर्धनासाठी उभारलेल्या पवित्र मंदिरात व मंदिराबाहेर सत्ताधारीच अपवित्र कारवाया करताना वा त्याला संरक्षण देताना आढळत आहेत. मा. मुख्यमंत्र्यांनी नंतर विधीमंडळात बोलताना, 'अशा वागण्याने आपण सर्व आमदार माजलो आहोत असा संदेश जनतेत जात असल्याचे', कबुल केले. मात्र यात आपल्या पक्षाच्या नेत्या कार्यकर्त्यांची चूक दिसत असतांनाही तसे म्हणणाऱ्या विरोधी पक्षियांना, अशा घटनेचे राजकारण न करण्याचा शहाजोग सल्लाही दिला. मुळात अशा उद्दाम वर्तणुकीचे मौखिक परवाने व अभय सत्ताधारी नेत्या कार्यकर्त्यांना देण्याचे गलिच्छ राजकारण करायचे आणि विरोधक आणि सनदशीर सामाजिक कार्यकर्त्यांना मात्र जन सुरक्षा कायद्याचा बडगा दाखवायचा, या दुट्टपी पणाचे हे परिणाम आहेत. असे वर्तन घडून गेल्यानंतर, विधिमंडळाची 'नैतिकता समिति' गठित करण्याचा अध्यक्षांचा फतवा म्हणजे 'बैल गेला नि झोपा केल्या'चाच प्रकार आहे! छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणेने महात्मा जोतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साने गुरुजी, एस. एम. जोशी, यशवंतराव चव्हाण, प्रबोधनकार ठाकरे, मृणाल गोरे, अहिल्या रांगणेकर आदींनी समाजकारण व राजकारण राज्यहितांच्या विचारांनी आणि नैतिक वर्तनाने उज्ज्वल केलेल्या महाराष्ट्राचा लौकिक, आजचे भ्रष्ट राजकारणी धुळीला मिळवत आहेत!

ताजा कलम: तिकडे दिल्लीत उपराष्ट्रपती मा. जगदीप धनखड यांना गेल्या आठवड्यात अचानक द्यावा लागलेला राजीनामा म्हणजे सत्ताधारी मुखियाच्या मेहेरबानीमुळे पदावर आलेल्या लाचार गुलामांचा कधी बँड वाजेल, त्यांना कधी गेट आऊट म्हटले जाईल याचा नेम नसल्याचा पुरावा आहे. सत्ताधाऱ्यांनी राज्यापासून केंद्रापर्यंत गुलामांचा बाजार भरवून, या लाचार गुलामांना पदांवर केवळ ती उबवण्यासाठी बसवण्याची घातक परंपरा चीड आणणारी आहे. लोकशाहीस मारक आहे. ती संपुष्टात आणली तरच राजकारणात लोकशाही, स्वाभिमान आणि नैतिकता टिकेल.

- संजय मंगला गोपाळ, कार्यकारी संपादक

टिप्पणी

गडचिरोली रक्तबंबाळ होत आहे: खाण प्रकल्पांची आक्रमणे थांबवा

गडचिरोली बचाओ मंच

'गडचिरोली बचाओ' या नागरिक मंचाच्या सदस्यांनी खासदार **सुप्रिया सुळे** यांची भेट घेऊन **खाणकामासाठी बेकायदेशीररीत्या १.२३ लाख झाडांची होणारी कत्तल** थांबवण्याची मागणी करणारे निवेदन दिले.

त्यांनी या मुद्द्याची गंभीर दखल घेतली, **आंदोलनाला पाठिंबा दर्शवला** आणि **स्वत:चे नावही या मोहिमेत सहभागी करण्याची तयारी** दर्शवली. या निवेदनात खालील मागण्या करण्यात आल्या:

- गडचिरोलीतील सर्व खाणविषयक मंजुरी व कार्यवाही तात्काळ थांबवाव्यात.
- पर्यावरणीय परिणाम अहवाल (EIA), सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) यांसह संपूर्ण पर्यावरणीय, जलस्रोत व सामाजिक अभ्यास करूनच सर्व मंजुरींचा फेरविचार करावा.
- जंगल व वाघांचे मार्ग (टायगर कॉरिडॉर) संरक्षित क्षेत्र म्हणून घोषित करावेत.
- वनहक्क कायदा, २००६ व PESA अंतर्गत असलेल्या सर्व नियमांचे पालन करावे.
- आदिवासी समुदायांच्या ग्रामसभा व पारदर्शक जनसुनावणीद्वारे मिळणाऱ्या संमतीचा सन्मान करावा.

काय चाललं आहे?

महाराष्ट्रातील सुमारे ७०% जंगल क्षेत्र असलेल्या गडचिरोली जिल्ह्यावर खाणकामाच्या हालचालींमुळे विनाशाचे संकट ओढवले आहे. हा परिसर गोंड व माडिया यांसारख्या आदिवासी जमातींसाठी सांस्कृतिक आणि आर्थिक जीवनवाहिनी आहे.

तरीही ओमसाईराम स्टील्स अँड अलॉयज प्रायव्हेट लिमिटेड, JSW स्टील्स लिमिटेड, सनफ्लॅग आयर्न अँड स्टील कंपनी लिमिटेड यांसारख्या मोठ्या कंपन्या, राजकीय पाठबळावर, गडचिरोलीला खाणकेंद्रात रूपांतरित करत आहेत.

अलीकडेच, लॉइड्स मेटल्स ॲण्ड एनर्जी या कंपनीला गडचिरोलीच्या राखीव ९३७ हेक्टर जंगलात १ लाखांहून अधिक झाडे तोडून लोखंड प्रक्रिया प्रकल्प उभारण्यासाठी पर्यावरणीय मंजुरी देण्यात आली आहे. याचा अर्थ असा की भारताच्या महत्त्वाच्या वाघांच्या संचारमार्गांपैकी एक मार्ग नष्ट होणार आहे.

सुरजगड, कोंसरी, दुर्गापूर आणि इंद्रावती येथेही अनेक खाण व प्रक्रिया प्रकल्प सुरू असून, पर्यावरणीय मंजुरी ग्रामसभा सल्लामसलत किंवा संमतीशिवाय दिली गेली आहे, जे PESA (अनुसूचित क्षेत्रांमध्ये पंचायत विस्तार अधिनियम), १९९६ आणि वनहक्क कायदा, २००६ अंतर्गत बंधनकारक आहे.

गडचिरोली जिल्ह्यात १,५६७ गावे असून त्यापैकी १,३११ गावे PESA अंतर्गत येतात. या कायद्यांमुळे स्थानिक ग्रामस्थांची संमती मिळवणे आवश्यक आहे, अन्यथा खाणकाम करता येत नाही. पण स्थानिक लोकांनी सांगितले की जनसुनावणीदरम्यान त्यांना भाग घेऊ दिले जात नाही किंवा धमकावले जाते, त्यामुळे त्यांचे मत व आवाज दुय्यम ठरतो. कोणतीही पूर्वसंमती किंवा माहिती दिली जात नाही! परिषद व सल्लामसलती बहुधा गावांपासून लांब घेतल्या जातात, त्यामुळे प्रभावित गावकऱ्यांना त्यात सहभागी होणे कठीण होते. "सुरक्षेच्या" कारणाचा वापर करून अधिकारी स्थानिकांचा आवाज दुर्लक्षित करतात.

सामाजिक परिणाम

या भागातील औद्योगिक व खाण प्रकल्प आदिवासींच्या पवित्र देवऱ्या आणि अनेक प्राण्यांच्या नैसर्गिक अधिवासांवर अतिक्रमण करत आहेत. मोह व तेंडू गोळा करणारे, उपजीविकेसाठी शेती करणारे आणि जंगलावर अवलंबून असलेले समुदाय संकटात आहेत, कारण त्यांच्या संमतीशिवाय व कोणतीही सुरक्षा न देता जंगल जमीन खाण व औद्योगिक कामांसाठी वापरली जात आहे.

त्यांना चांगल्या नोकऱ्यांचे खोटे आश्वासन दिले जाते, पण प्रत्यक्षात त्यांना सुरक्षारक्षक किंवा खाण संबंधित मजुरी कामांमध्ये जबरदस्तीने ढकलले जाते.

बाहेरील लोकांच्या आगमनामुळे लिंगाधारित हिंसाचारात वाढ झाल्याचे दिसून येते. महिलांवर होणारा त्रास वाढला आहे, त्यांना एकटं बाहेर जाण्याची भीती वाटते, आणि त्या स्वत:च्या घरी व गावातही असुरक्षित वाटतात. त्यांची सुरक्षा, स्वायत्तता

(पान १६ वर)

टिप्पणी

जन सुरक्षा विधेयक : हुकूमशाहीचा संविधानबद्ध अध्याय

सुनील मनवर

लोकशाहीत अधिनायकशाहीचे बीज कसे पेरले जाते याचं एक परिपूर्ण उदाहरण महाराष्ट्र सरकारने २०२५ मध्ये सादर केलं – जन सुरक्षा विधेयक. 'सामाजिक सलोखा', 'सुरक्षा', 'शांतता', या सुसंस्कृत पण खोट्या शब्दांच्या आड लपवलेलं हे विधेयक म्हणजे एक विचारांचा कर्फ्यू आहे. संविधानाच्या चौकटीत राहून विचार करणाऱ्यांना गुन्हेगार ठरवण्याचा अधिकृत हुकूम. ही एक घोषणा आहे की, आता तुम्ही जिवंत आहात, तोपर्यंत तुम्ही सरकारच्या शिस्तीत बोलाल – अन्यथा तुम्ही 'धोका' ठरता.

हा कायदा म्हणजे एक अशा काळाची सुरुवात आहे जिथे लेखणीचं टोक जास्त धोकादायक मानलं जातं. जिथे सरकारवर प्रश्न विचारणं ही गुन्हेगारी कारवाई ठरते. आणि जिथे संविधानाचा आधार घेणं म्हणजे देशविघातक कृत्य ठरतं. सरकारने हा कायदा करून स्वत:वरच आरोप सिद्ध केला आहे की त्यांना संविधान मान्य नाही, त्यांना विचार मान्य नाही, त्यांना लोकशाहीच नको आहे.

हा कायदा काय म्हणतो? तो म्हणतो की, कोणीही व्यक्ती वा संघटना जी सरकारच्या मते समाजाच्या 'सुरक्षेला धोका' निर्माण करते, तिच्यावर कठोर कारवाई करता येईल. कोणत्याही सार्वजनिक सभेला, निदर्शनाला, आंदोलनाला परवानगी लागेल. सोशल मीडियावर लिहिलेलं एखादं मत, भाषणात घेतलेला एखादा मुद्दा, किंवा दुसऱ्या देशातील घटना याविषयी व्यक्त केलेली सहवेदना देखील तुमच्यावर 'राज्यविरोधी' कारवाईला कारणीभूत ठरू शकते.

पण यामध्ये प्रश्न परिभाषेचा आहे. 'धोका' म्हणजे काय? 'सामाजिक सलोखा' म्हणजे काय? 'राज्यविरोध' म्हणजे काय? या संज्ञा एवढ्या लवचिक आहेत की, सत्तेला नको असलेला प्रत्येक नागरिक या पिंजऱ्यात बसवता येईल. याचा अर्थ हा कायदा म्हणजे सत्तेच्या दृष्टिकोनातून संविधानात केलेली 'फायनल एडिटिंग' आहे – ज्यात असहमतीचे सारे परिच्छेद कापून टाकले गेले आहेत.

ही अंमलबजावणी कशी होते, हे आपण याआधीच्या घटनांमधून पाहिलं आहे. एल्गार परिषदेत सहभागी झालेल्या विचारवंतांवर भीमा कोरेगाव हिंसाचार प्रकरणानंतर UAPA लावण्यात आला. त्यांच्या घरांमधून जप्त केलेले पुस्तके, कविता, आणि चळवळीसंबंधी पत्रव्यवहार हेच त्यांच्यावरचे 'पुरावे' बनले. केवळ दलितांचा सन्मान करण्यासाठी भरवलेली परिषद 'देशविघातक कारवाया' म्हणून घोषित झाली. यातून हे स्पष्ट होतं की, प्रश्न उपस्थित करणं हा गुन्हा आहे आणि त्याचं शिक्षेसारखं मूल्यमापन केलं जातं.

पुढे सीएए विरोधातील आंदोलने आली. यामध्ये तर विद्यार्थिनींवर देशद्रोहाचे आरोप लावण्यात आले. दिल्लीतील आंदोलनकर्त्यांवर 'कट रचण्याचे' आरोप लावले गेले. या सर्व घटनांत सरकारचा एकच हेतू स्पष्ट होता dissent is a threat. आणि आता जन सुरक्षा कायदा त्या प्रयत्नाला अधिक स्पष्टतेने पूर्णत्वाकडे घेऊन जातो.

या कायद्याचा विशेष उपयोग होतो तो आदिवासी, दलित, महिलांच्या हक्कांसाठी लढणाऱ्या चळवळींवर. कारण याच लोकांनी गेल्या काही वर्षांत सरकारला प्रश्न विचारले. त्यांनी जंगलहक्क मागितला, स्त्रियांच्या प्रतिनिधित्वासाठी आंदोलने केली, जल–जंगल–जमीनच्या मालकीविषयी मूलभूत मुद्दे उपस्थित केले. ते संविधानाच्या चौकटीत राहून लढले. पण त्यांचा गुन्हा होता – ते बोलत होते. ते विचार करत होते. ते बदल मागत होते. आणि म्हणूनच हा कायदा त्यांच्या शिरावर आणला गेला आहे.

या सगळ्याचा एक धक्कादायक पैलू म्हणजे – हा कायदा केवळ विचार करणाऱ्यांवरच लागू होतो, पण द्वेष पसरवणाऱ्यांवर नाही. बजरंग दल, हिंदू युवा वाहिनी, किंवा काही स्वयंघोषित संत जे खुलेआम धार्मिक तेढ पसरवतात, अल्पसंख्यांकांवर टिका करतात, मॉब लिंचिंगचं समर्थन करतात

– त्यांच्यावर मात्र कोणताही कायदा लागू होत नाही. त्यांचं बोलणं ‘स्वातंत्र्य’ मानलं जातं, आणि अभ्यासकांचं लिहिणं ‘राज्यविरोध‘ ठरतं. या विरोधाभासामुळेच हा कायदा केवळ दडपशाहीचा नाही, तर राजकीय निवडकपणाचा सर्वोच्च नमुना ठरतो. हा कायदा ‘उजव्या‘ सुरक्षिततेचं आणि ‘डाव्या’ विनाशाचं शस्त्र आहे.

महाराष्ट्र सरकारचा हा कायदा म्हणजे UAPA, देशद्रोह, आणि इतर दडपशाही कायद्यांचं ‘राज्य–केंद्र समन्वयित व्हर्जन‘ आहे. कारण या आधी UAPA आणि देशद्रोहाचे निर्णय केंद्र सरकारच्या अखत्यारीत होते. पण जन सुरक्षा विधेयक राज्य सरकारला स्थानिक पातळीवर सत्तेच्या विरोधातील प्रत्येक गड पराभूत करण्याचं अधिकृत हत्यार देतो.

या कायद्यामुळे शासन आणि प्रशासनाला अमर्याद अधिकार मिळतात. एखाद्या व्यक्तीच्या निधीवर नियंत्रण ठेवण्याचे, तिच्यावर पाळत ठेवण्याचे, तिच्या संपर्कांवर निर्बंध घालण्याचे. न्यायालयीन परवानगीशिवाय हे सर्व केलं जाऊ शकतं. म्हणजेच, संविधानातल्या अनुच्छेद १९ मधील स्वातंत्र्य विचार, अभिव्यक्ती, संघटन आणि शांततेने एकत्र येण्याचा हक्क हे सर्वच आता परवानगीशिवाय ‘गैरकायदेशीर‘ होऊ शकतात.

याचा अर्थ, विचार करणं हीच गुन्हेगारीची प्राथमिक पात्रता ठरवली जात आहे. आणि हेच या कायद्याचं सर्वात भयावह रूप आहे – तो व्यक्तीला गुन्हेगार ठरवत नाही, तो संपूर्ण विचारप्रवाह गुन्हेगारीच्या कक्षेत आणतो. त्यामुळे आज एका कार्यकर्त्यावर कारवाई झाली, उद्या त्या चळवळीच्या प्रत्येक समर्थकावर होईल, आणि परवा तो विचार मुळासकट नष्ट केला जाईल.

हे चित्र फक्त काळजीच निर्माण करत नाही – ते संताप निर्माण करतं. कारण हा कायदा म्हणजे जाहीरपणे सांगितलेली एक गोष्ट आहे – की संविधान या सत्तेच्या वाट्याला नको आहे. ही सत्ता सहमती मागत नाही – ती शरणागती मागते. ती चर्चेचा मार्ग नाकारते – ती भीतीचा मार्ग तयार करते.

हा कायदा जर आज गप्प बसून आपण पार पडू दिला, तर उद्या कोणतंही मत मांडण्यासाठी आपल्याला सरकारची परवानगी घ्यावी लागेल. आणि जर ती परवानगी नसेल, तर आपलं मत म्हणजे गुन्हा ठरेल. ही फक्त शक्यता नाही, हे वास्तव घडवण्याचा नकाशा आहे आणि त्याच्या प्रत्येक रेषेवर आपली मौन संमती असेल.

लोकशाही ही सत्ता नव्हे – ती संघर्ष आहे. ती संघर्ष करणाऱ्यांनी टिकवली आहे. ती संविधानाच्या चौकटीत न्याय मागणाऱ्यांनी मोठी केली आहे. आणि आज तीच लोकशाही या कायद्यामुळे पोलिसांच्या, गुप्तचर यंत्रणांच्या, आणि सत्ता नावाच्या विचारी भीतीच्या हातात दिली गेली आहे. विचार करणाऱ्यांना बंदी करण्यासाठी, विचार विकणाऱ्यांना पुरस्कार देण्यासाठी, आणि विचारशून्यांना सर्वाधिक मोकळीक देण्यासाठी हा कायदा तयार केला आहे.

त्यामुळे याविरोधात उभं राहणं ही केवळ राजकीय भूमिका नाही – ती आपल्या प्रत्येकाच्या विवेकाची लढाई आहे. हा लढा डाव्या किंवा उजव्या विचारांचा नाही – हा लढा विचारसरणी टिकवण्याचा आहे. आज जर आपण गप्प राहिलो, तर उद्या सरकार आपल्यासाठी देखील ‘धोका‘ असं म्हणू शकेल. आणि जेव्हा ते होईल, तेव्हा आपल्याला आपली चूक कळेल – पण ती कळण्याची किंमत ‘स्वातंत्र्य‘ असेल.

sunilmanvar3@gmail.com

NAPM चे आवाहन
सामाजिक सलोखा सप्ताह
९ ते १५ ऑगस्ट

तपशील पान २३ वर

आपापल्या ठिकाणच्या सलोखा सप्ताह कार्यक्रमाचे फोटोंसह वृत्तांत सिरत सातपुते यांना ८१४९६७३९२९या WhatsApp नंबर वर किंवा satputesirat@gmail.com या इमेलवर पाठवा. पुढील अंकात त्यास प्रसिद्धी मिळेल.

- जनआंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय, महाराष्ट्र

टिप्पणी

पॅलेस्टाइनला मदत करणाऱ्यांची सुटका करण्याचे आवाहन

NAPM

ब्रिटिश सरकारने त्वरित कृती करावी या साठी चळवळीतील आमच्या साथींना आणि भारतभरातील जागरुक नागरिकांना आम्ही आवाहन केले होते की त्यांनी आम्ही दिलेल्या लिंक वर जाऊन फॉर्म भरुन पाठवावा. अटक केलेल्या कार्यकर्त्यांची सुटका करणे, मदलीन (Madleen) जहाज व त्यावरील मदतसामग्री परत मिळवणे, आणि इस्रायलला युद्धगुन्हे व वंशसंहाराबाबत जबाबदार धरणे, ही या पत्रामागील मुख्य मागणी आहे.

आपल्या सर्वांना माहीत आहेच की, ९ जून २०२५ रोजी, इस्रायलने आंतरराष्ट्रीय पाण्याच्या हद्दीतून UK ध्वज असलेल्या मदलीन जहाजावरून १२ आंतरराष्ट्रीय एकजूट कार्यकर्त्यांचे अपहरण केले जे गाझामधील जबरदस्तीच्या सामूहिक उपासमारीचा सामना करत असलेल्या पॅलेस्टिनी लोकांसाठी अन्न, बाळासाठी दूध आणि औषधे पुरवण्यासाठी निघाले होते. फ्रीडम फ्लोटिला कोॲलिशनच्या मानवी मदतीच्या मोहिमेचा हा भाग होता आणि त्यावरचा हल्ला आंतरराष्ट्रीय कायदा, नागरी एकजूट आणि वंशसंहाराविरुद्ध प्रतिकार करण्याच्या हक्कावर थेट आघात आहे.

मदलीनवर असलेल्या शूर कार्यकर्त्यांनी त्या ठिकाणी सरकारांनी जे करायला हवे होते, ते केले. आता आपण त्यांच्या पाठीशी आपल्या चळवळींचे बळ उभे करूया.

ही सही केलेली पत्रे ब्रिटिश उच्चायुक्तालय, नवी दिल्ली आणि हैदराबाद, कोलकाता, मुंबई, चेन्नई, अहमदाबाद, बेंगळुरू, चंदीगड येथील ब्रिटिश उप–उच्चायुक्तालयांना प्रत्यक्ष आणि ई–मेलद्वारे पाठवली.

संघर्षात आणि ऐक्यभावनेत,

पॅलेस्टाईन सॉलिडॅरिटी ग्रुप

नॅशनल अलायन्स ऑफ पीपल्स मूव्हमेंट्स (NAPM)

(टिप्पणी: पान १३ वरुन)

आणि जगण्याची शैली हळूहळू नष्ट होत आहे, असं 'Mining, Repression and Resistance' (२०२३) या अहवालात नमूद करण्यात आलं आहे.

पर्यावरणीय परिणाम

मोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांचे बहुतांश खाण प्रकल्प पर्यायी वनीकरणाचे आश्वासन देतात. मात्र, वनीकरणासाठी निवडलेली ठिकाणे प्रभावित भागांपासून मैलोनमैल दूर असतात, त्यामुळे त्याचा खरा उपयोग होत नाही.

लोखंड प्रक्रिया केंद्रांसाठी मोठ्या प्रमाणात पाण्याची गरज असते, धूळ नियंत्रण व धातू शुद्धीकरणासाठी. अति पाण्याचा वापर भूगर्भजल पातळी कमी करू शकतो, ज्यामुळे पाण्याची टंचाई अधिक तीव्र होऊ शकते. लाखो झाडांची तोड केल्याने नैसर्गिक संरक्षण करणारे वनस्पती आणि मातीचे वरचे थर नष्ट होतात, परिणामी मातीची धूप, मातीची गुणवत्ता खालावणे आणि नद्यांमध्ये गाळ साचणे असे गंभीर परिणाम होतात.

लोखंड खाणकामामुळे नद्यांमध्ये रसायनयुक्त सांडपाणी मिसळले जाते, त्यामुळे गोडं पाणी लालसर होतं आणि पिण्यायोग्य राहत नाही. प्रकल्पातून बाहेर पडणारे पाणीही गाळ आणि धातू घेऊन नद्यांमध्ये मिसळते, ज्यामुळे पाण्याची गुणवत्ता खालावते आणि प्रदूषणाचा धोका वाढतो. याचा परिणाम केवळ जवळच्या आदिवासी समाजाच्या आरोग्यावरच नव्हे, तर या पाण्यावर अवलंबून असणाऱ्या वन्यजीवांवरही होतो.

असे मानले जाते की या भागातील लोक सिलिकोसिस, निर्जलीकरण आणि पचनसंस्थेच्या विकारांनी त्रस्त आहेत. लोखंडाचे अंश शरीरातील द्रव संतुलनावर दीर्घकाळ परिणाम करू शकतात, अगदी खाण बंद पडल्यावरही.

जंगलतोड आणि मातीची धूप यामुळे नद्यांमध्ये अधिक गाळ साचतो, परिणामी गडचिरोली भागात पूर येण्याचा धोका वाढतो, ज्यामुळे पिकांचे, घरांचे आणि पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान होऊ शकते.

(या संदर्भात अधिक माहितीसाठी संपर्क: डॉ. सतीश गोगुलवार arogyasathi@gmail.com)

राजकारण

विकासाबाबत सत्ताधाऱ्यांच्या पोकळ वल्गना!

आ. श्री. केतकर

कोणत्याही गोष्टीची टाळाटाळ करायची अनेकांची रीत असते. म्हणजे 'बघू या', 'नक्की करूया, पण त्याला थोडा काळ जावा लागेल', किंवा संघाच्या प्रघाताप्रमाणे म्हणायचं तर 'योग्य वेळी करू'. किंवा 'बघू जमेल तसं करू की' असंही म्हणतात. तर काही जण 'काळजी कसली करताय, झालंच समजा', असं सांगतात. खरं तर हे त्यांच्याच्यानं होणार नसतं किंवा त्यांना जमणारही नसतं, पण स्पष्ट शब्दांत 'करणार नाही' किंवा 'होणार नाही', असं म्हणायला त्यांना अवघड वाटत असावं. किंवा सरळ 'नाही' म्हटलं, तर आपली प्रतिमा खराब होईल, असं वाटणाऱ्यांसाठी सोयीची म्हणून ही पळवाट.

नाहीतरी म्हणतातच ना, 'अशुभस्य कालहरणं'. हे वचन ध्यानात ठेवूनच ते असे उद्गार काढत असावेत. किंवा 'क्या खाना, तो दम खाना' यावर त्यांचा विश्वास असतो. खास करून राजकारण्यांची वा नेत्यांची अशी भाषा असते. त्यामुळेच स्पष्टपणे 'नाही' असं न म्हणता काही जण 'नक्की करणार, करणार म्हणजे करणारच', 'झालंच समजा' असं म्हणतात. पण केव्हा हे मात्र कधीच सांगत नाहीत. तर कुणी मात्र अगदी गंभीरपणे म्हणतात, 'अरे, हा माझा शब्द आहे, पुढच्या खेपेला नक्की करणार'. अर्थात यामागे त्याचा हेतू, मला पुन्हा पुढच्या वेळी नक्की निवडून द्या, असं सांगण्याचाच असतो.

म्हणजे काही काळापूर्वी महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदारांचीं देखील अशीच, पण जरा वेगळी रीत होती. कुणी त्यांना विचारलं की, 'तुम्ही लग्न का करत नाही?' तर ते हसत हसत पण ठामपणे सांगत, 'अहो, मी कुठं नाही म्हणतोय. मी फक्त पुढच्या वर्षी बघू', असं म्हणतो. यामुळेच त्यांना विचारलं की, 'तुम्ही शिवचरित्र लिहिणार तरी कधी?' तर ते ठरलेलं उत्तर देत म्हणत की, 'सारी कागदपत्रं मिळाली, आणि सत्यतेचे पुरावे मिळाले की, करणारच लिहायला सुरुवात.' सततच्या अशा या चालढकलीनं त्यांनी शिवचरित्रही अखेरपर्यंत लिहिलंच नाही. त्यामुळे त्यांचं शिवचरित्र हा केवळ विनोदाचा वा टिंगलीचाच विषय होऊन बसला होता.

हे सगळं आठवायचं कारण म्हणजे नुकतंच आपल्या मुख्यमंत्र्यांना 'शेतकऱ्यांची कर्जमाफी कधी होणार? 'लाडक्या बहिणीं'ना वाढीव रक्कम केव्हा मिळणार?' असं ज्या वेळी विचारलं गेलं, तेव्हा त्यांचं उत्तर होतं की, 'योग्य वेळी करू. योग्य वेळी वाढीव रक्कमही देऊ'. किंवा विधानसभेच्या अध्यक्षांना विचारण्यात आलं की, विरोधी पक्षनेता कधी नेमणार? त्यावर ते म्हणाले की, 'तुम्ही हा प्रश्न चार महिन्यांनी करताहात, त्याबाबत मी योग्य वेळी निर्णय घेईन'.

यांची अशी चालढकल आपण अनेक प्रसंगी पाहिली आहे. अनेक प्रश्नांना त्यांनी कधीच उत्तरं दिली नाहीत. किंवा तत्कालीन राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी 'विधानपरिषदेच्या रिक्त जागा कधी भरणार?' या महत्त्वाच्या प्रश्नाला कधीही उत्तर दिलं नाही आणि अशा प्रकारे, विधानपरिषदेतील अकरा रिकाम्या जागा भरण्यासाठी सरकार बदलेपर्यंत वेळ काढला. पण समजा राज्यातील सरकार बदललंच नसतं, तर त्यांनी काय केलं असतं, असा विचार मनात येतो.

खरं म्हणजे राज्यपाल पदावरील व्यक्तीनं कोणत्याही प्रकारचा पक्षपात न करता निर्णय घ्यायला हवेत, अशी अपेक्षा असते. भगतसिंग कोश्यारी राज्यपाल होते, तरी त्यांनी त्यांच्या पक्षाचंच हीत बघितलं, असंही कुणी जाणकार लोक म्हणतात. (हल्लीच्या प्रथेनुसार त्या जाणकार अभ्यासू लोकांना 'देशद्रोही'च म्हणायचं, कारण सत्तारूढ पक्षाच्या विरोधात जो बोलेल वा कृती करेल, त्याची हल्ली 'देशद्रोही', 'शहरी नक्षलवादी' अशीच संभावना केली जाते.) पण त्या राज्यपालांना हे माहीत असतं का, की ज्या पक्षामुळे आपण या पदावर आलो, त्याची परतफेड तर आपण करायलाच हवी. तसंही अलीकडे अनेक राज्यपाल हे अपेक्षेप्रमाणे निरपेक्ष बुद्धीने, सर्वांना समान लेखून, पक्षपात न करता निर्णय घेत नाहीत. त्यांचं वागणं 'जी हुकूम' म्हणत सत्तारूढ पक्षाच्या त्यांच्याकडून ज्या अपेक्षा

असतात त्या पुऱ्या करणारंच असतं.

महाराष्ट्रात पहिल्यांदा शिवसेना आणि त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस या दोन पक्षांत फूट पडली. खरं तर ती काही आश्वासनं किंवा इन्कमटॅक्स, ईडी, चौकशी अशी धमकी देऊन वा पैशाची लालूच दाखवून पाडली गेली. कुणी मुख्यमंत्री बनलं तर कुणी उपमुख्यमंत्री. त्यामुळे ते ज्या पक्षात होते, त्या पक्षांचे दोन भाग झाले. त्यांना 'शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)' आणि 'शिवसेना (एकनाथ शिंदे)' असं म्हटलं जाऊ लागलं. तर राष्ट्रवादी काँग्रेसचेही, संस्थापक शरद पवार गट आणि फुटून निघालेला अजित पवार गट, असे दोन भाग अस्तित्वात आले. त्यामुळे या दोन गटांपैकी खरा पक्ष कोणता हा प्रश्न न्यायालयाकडे नेण्यात आला, पण त्याची सुनावणी मात्र लांबणीवरच पडत गेली आहे.

याबाबतचा निर्णय खरं तर महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीआधी तरी व्हायला हवा होता, पण तो आजतागायत लागलेला नाही. बहुधा तो अपेक्षेप्रमाणे लागणार नाही, अशी काळजी सत्तारूढ पक्षाला असावी, कारण यातील फुटीरांच्या एका गटाच्या साथीनंच तर त्यांनी राज्यात सत्ताबदल घडवून आणला होता आणि दुसऱ्याच्या सहाय्यानं सत्ता आणखी मजबूत केली होती.

शिवाय लोकसभा निवडणुकीत जनतेनं सत्तारूढ युतीच्या विरोधातच मतदान केलं होतं. कदाचित यामुळेच आजही याबाबतचा निर्णय झालेला नाही, आणि याबद्दल नाही म्हटलं, तरी काहीशी धाकधूक सत्तारूढ युतीतील या पक्षांच्या मनामध्ये आहे. त्यातच न्यायालयातील दिरंगाईमुळे या वादाचा निर्णय कधी आणि कसा होईल, हे सांगणं तसं अवघडच आहे. कारण राममंदिर प्रकरणानंतर त्या वेळचे बरेच न्यायाधीश आज तेथे नाहीत, त्यामुळे कदाचित निकाल आपल्या विरोधातही जाऊ शकतो, असंही त्यांचं मन सांगत असावं.

महाराष्ट्रातील अचानक वाढलेली मतदारसंख्या आणि मतदार यांच्याबाबत निवडणूक आयोगानं अद्यापही खुलासा केलेला नाही, किंवा काही मतदारसंघांत मतदारांच्या संख्येपेक्षा काही ठिकाणी त्याहीपेक्षा जास्त मतं कशी पडली, याबाबत चकार शब्दही काढलेला नाही.

कधीकधी तर असं वाटतं की, संघाच्या मुशीतून घडलेल्या या लोकांना अशा प्रकारे आपल्या फायद्यासाठी वेळकाढूपणा करायची तालीम मिळालेली असते की काय! त्यामुळेच पंतप्रधानदेखील अनेकदा हमी देतात, ती साधारण काही काळानंतरची, म्हणजे २०२७ पर्यंत असं होईल, कधी २०३० पर्यंत ते होईल, तर कधी २०४७ मध्ये नक्कीच असं होईल, असं ठासून सांगतात.

आता तोपर्यंत काय काय बदललं असेल, हे कुणास ठाऊक आणि अशी आश्वासनं किती जणांच्या ध्यानात राहतील, आणि तसंच सांगायचं तर काही वेगळं घडलं तरी, तोवर उत्तर द्यायला आश्वासनं देणाऱ्यांच्यातील कोण असेल, हा विचार त्यांना टाळ्या देणाऱ्यांच्या मनातच कधी येत नाही. दुसरं म्हणजे आपण म्हटलं म्हणजे ते झालंच आहे, असा त्यांचा आविर्भाव असतो.

दुसरीकडे सत्तारूढांची मनमानी सुरूच असते. म्हणजे 'हिंदी, हिंदू, हिंदुस्तान' असं म्हणून हिंदी लादण्याची आडमार्गाने सक्ती करत राहायचं, आणि वरिष्ठांना खूष करण्यासाठी त्यांच्या पक्षाचं राज्य असलेल्यांनीही तसंच वागायचं असा हा सारा खेळ. शिवाय फुटीर गट त्यांची तळी उचलायला तयारच असतात. अर्थात ते कधी स्पष्ट विरोध न करता मौन पाळतात. कुणी नुकतेच सामील झालेले तर आपण त्यांच्यापेक्षाही अधिक कट्टर आहेत, असं दाखवण्याचा प्रयत्न करतात. म्हणजे त्यांना आम्ही 'मोअर लॉयल दॅन द मास्टर' आहोत असं भासवायचं असतं.

याप्रमाणेच राजकीय पुढाऱ्यांची आणखी एक रीत आहे. म्हणजे असं की, कणी काही आरोप केले की, ते फेटाळून न लावता म्हणायचं की, तुमच्या अनेक प्रकरणाची सारी कागदपत्रं आमच्याकडं आहेत आणि वेळ आली की, ती सादर करू. पण कित्येकदा अशा गर्जना करूनही ती कधीच सादर होत नाहीत. असलीच आणि ती त्यांनी सादर केलीच, तर त्यांचा फोलपणा किंवा बनवेगिरी न्यायालयात सिद्ध होईल, अशी भीती असते. बरं तर बरं, त्यांना कुणी विचारतही नाहीत की, तुमच्याकडं आहेत म्हणता, तर ती कागदपत्रं तुमच्या बोलण्याचा पुरावा म्हणून आम्हाला आत्ताच का दाखवत नाही? पण हा खेळ आता लोकांच्या ध्यानात आला आहे.

हीच गोष्ट सत्ताधाऱ्यांच्या वल्गनांची. म्हणजे 'समृद्धी

मार्गा' साठी अनेक झाडं तोडण्यात आली. त्याबाबत टीका झाली तेव्हां सांगितलं गेलं की, या समृद्धी मार्गाच्या दोन्ही बाजूंना आम्ही कोट्यवधी झाडं लावणार आहोत. पण आजवर त्या मार्गाच्या वेळोवेळी प्रसिद्ध झालेल्या छायाचित्रांत तरी ती झाडं सोडा, पण झुडपंही कुठं दिसलेली नाहीत. पण समृद्धी मार्गावर अनेक मोठमोठे खड्डे पडल्याची छायाचित्रे वर्तमानपत्रांत येत होती, त्यांत खड्डे उठून दिसत होते आणि नंतर आलेल्या पावसामुळे त्याची नदी कशी झाला आहे, हे दाखवणारी छायाचित्र वर्तमानपत्रांत आली, तेव्हा त्यात रस्ता म्हणजे नदीच बनला आहे, हे स्पष्ट दिसत होते.

या मार्गाच्या आजूबाजूला असलेल्या शेतांचं किती नुससान झालं आहे, हेही बातम्यांत येत होतं. अशाच प्रकारे नेहमी सांगण्यात येतं की, आम्ही किती झाडं लावली. त्यांचे आकडे हजार, लाख किंवा कोटीपर्यंत सांगितले जातात. पण काही काळानंतर विचारलं की, किती झाडं जगली, तर त्याकडं दुर्लक्षच केलं जातं. बहुतेक त्यांना वाटत असावं की, झाडं लावली, म्हणजे झालं काम! पण झाडं जगवण्यासाठी किती कष्ट घ्यावे लागतात, हे त्यांना माहीतच नसतं, किंवा त्याबाबतचा विचारच ते करत नसावेत. पवित्र गंगानदी अगदी शुद्ध करणार असं सांगून त्यावर हजारो कोटी रुपये आजवर खर्च झाल्याचं सांगण्यात येतं, पण गंगा मात्र अजूनही 'राम तेरी गंगा मैली' म्हणता येईल अशीच आहे.

तीच गोष्ट शहरांमधील 'नदी सुधार प्रकल्पा'च्या नावाखाली चाललेल्या झाडांच्या कत्तली आणि अन्य वाताहतीची. तुमच्या या करणीनं पुराचं पाणी शहरात अन्यत्रही पसरेल असं सांगितलं गेलं, तर त्याकडे दुर्लक्षच करायचं किंवा 'छेः, असं काही होणार नाही' असं उत्तर द्यायचं. म्हणजे आम्ही सांगतोय म्हणजे ते खरंच आहे, हे पटवून देण्याचा त्यांचा प्रयत्न असतो.

एकीकडं 'राज्याची भरभराट करायची आहे, शेतकऱ्यांना समृद्ध करायचं आहे' असं सांगायचं आणि त्यांना आश्वासनं द्यायची, पण त्यापैकी प्रत्यक्षात काहीच द्यायचं नाही, नुसतं 'देऊ, नक्की देणार' असं म्हणत राहायचं, किंवा निवडणूक आली की, त्यांची मतं मिळावी म्हणून थोडंफार द्यायचं ही रीत आहे. आणि विरोधाभास असा की, शेतीमालाचं उत्पादन वाढवायचं आहे, असं एकीकडं सांगायचं आणि दुसरीकडे 'शक्तीपीठ मार्ग' म्हणून शेतकऱ्यांच्या अत्यंत सुपीक जमिनी, तसंच बागायती जमिनी बळकावण्याचा बेत करायचा. त्या मार्गाला विरोध झाला, तेव्हा निवडणुकीच्या आधी तो प्रकल्प होणार नाही, असा दिलासा द्यायचा प्रयत्न मत मिळवण्यासाठी करायचा. आणि त्या आश्वासनांना खरं मानून लोकांनी मोठ्या संख्येनं मतं दिली की, निवडून आल्यानंतर मात्र त्या प्रकल्पाचाच पाठपुरावा करायचा.

आधीच एक महामार्ग असताना त्याला समांतर असा दुसरा महामार्ग का तयार करायचा, या प्रश्नावर मात्र उत्तर द्यायचं नाही आणि त्यांना सामील असणाऱ्या अन्य पक्षांनीही गप्पच राहायचं, असं धोरण असावं. शिवाय हा शक्तीपीठ मार्ग तयार झाला की, तुमची (म्हणजे कुणाची) भरभराट होईल असं म्हणत राहायचं. (हे म्हणजे 'सबका साथ, सबका विकास' म्हणायचं, पण खरं तर 'हमारा' अर्थात सत्तारूढ पक्षाचा विकास करून घ्यायचा, यासारखंच झालं.)

काही विरोध करणारे मोहाला बळी पडून विरोध मागं घेतातही. पण त्यांना ठाऊक असतं की, काही प्रकल्पांसाठी जमिनी तर घेतल्या, पण ते प्रकल्प कधी अस्तित्वातच आले नाहीत, आणि त्या जमिनी मालकांना परत न करता, इतर कुणाला तरी, म्हणजे त्यांना भरघोस निधी देणाऱ्यांना किंवा मर्जीतील काहींना विकण्यात आल्या किंवा आजतागायत त्या नुसत्याच पडून आहेत. म्हणजे त्यातून जे उत्पन्न जमीन मालकांना झालं असतं, तेही झालं नाही, म्हणजे जमीन मालकांची अवस्था तेल गेलं, तूप गेलं, हाती आलं केवळ आश्वासनांचं धुपाटणं, अशीच झाली आहे. त्यामुळेच शक्तीमार्गाला होणारा विरोध वाढतोच आहे. मात्र त्याचा कितपत उपयोग होईल याबाबत शंकाच आहे, कारण आम्ही म्हणू तेच इतरांनी मानायला हवं, असा कारभार सध्या सुरू आहे.

लोकांना हे कळत नाही की, या साऱ्यालाच विकास म्हणायचं असतं. कारण विकासाच्या यांच्या कल्पनाच वेगळ्या असाव्यात. म्हणजे शिक्षण, संशोधन, आरोग्य वगैरे अत्यंत महत्त्वाच्या बाबींकडे दुर्लक्षच करायचं आणि धार्मिक स्थळं,

(पान २८ वर)

श्रमिक जगत

गिग कामगारांची असहायता

नीलांबरी जोशी

समजा, मुंबईतल्या अंधेरी वेस्टमधल्या एका मुलीनं लोखंडवालामधल्या इटालियन रेस्टॉरंटमधून झोमॅटोवर पास्ता मागवला तर अल्गॉरिदम्स त्या भागातला डिलिव्हरी बॉय शोधायला लागतात. समजा राम दयाल, कन्हैय्यालाल, प्रेमकुमार आणि अरबाज अली असे चौघंजण तिथे जवळच आहेत. आता त्या चौघांपैकी कोणाकडे आॅर्डर जाईल हे अनेक गोष्टींवर ठरतं. उदा. कामगाराचं नेमकं ठिकाण, त्याचं रेस्टॉरंटपर्यंतचं नेमकं अंतर, त्याचा डिलीव्हरीचा सर्वसाधारण वेग, तो कामगार किती लवकर वस्तू पोचवतो त्याची हिस्ट्री, कस्टमर्सनी त्याला दिलेलं रेटिंग इ. या आणि अशा गोष्टींचा अभ्यास करुन काही सेकंदात अल्गॉरिदम्स निर्णय घेतात आणि त्यातल्या एकाला मोबाईलवर मेसेज जातो.

दर काही आठवड्यांनंतर मॅनेजर्स या डेटाचा अभ्यास करुन अल्गॉरिदम्सना नवीन नियम शिकवतात. ग्राहकांना चांगल्यात चांगला अनुभव मिळावा यासाठी हे नियम काम करतात. वाहन बुकिंग असो, खाद्यपदार्थांची डिलिव्हरी असो किंवा इ–कॉमर्सचे व्यवहार – ग्राहक राजा असतो. काहीवेळा नवीन नियमांमुळे डिलिव्हरीचं काम करणा–या कामगारांच्या वेतनावर परिणाम होतो. मग ते रागावून संप करतात. हे बदल त्यांचं वेतन कमी करण्यासाठी केलेले नसतात. पण कंपनीला तोटा मान्य नसतो आणि ग्राहकांना प्राधान्य असतं. मग "कोणीतरी" त्यासाठी किंमत मोजावीच लागते.." हे "कोणीतरी" म्हणजे कामगार.

****

आपली खरेदी करणं, खाणं, विक्री करणं, दिवसभरातलं वावरणं हे तंत्रज्ञानामुळे आमुलाग्र बदललं आहे. स्विगी, झोमॅटो, ॲमेझॉन, उबेर अशा ॲप्समुळे आधुनिक जीवन सुसह्य केल्याचा भास होतो. त्यातून आपला वेळ वाचतो. अनेकांना रोजगार मिळतो आणि अचानक इच्छा झालेला खाद्यपदार्थ मिळण्यापासून अचानक घरातली संपलेली वस्तू हातात येऊन ग्राहकांना दिलासा मिळतो.

पण या डिजिटल जगामागे एक अदृश्य जग आहे. ते तात्पुरत्या, असंघटित कामगारांचं जग, जागतिक सत्ताकेंद्रांच्या दडपशाहीला निमूट बळी पडत चाललेलं आहे. सुविधांना बळी पडत जाणा–या ग्राहकांना या जगाबद्दल संपूर्ण अज्ञान आहे.

"ओटीपी प्लीज" हे वंदना वासुदेवन यांचं अभ्यासपूर्ण पुस्तक इ–कॉमर्सच्या दुनियेतल्या दक्षिण आशियातल्या अशा गिग वर्कर्सच्या कहाण्या आपल्यासमोर मांडतं. टेक कंपन्यांचा कारभार, त्यांची धोरणं इथपासून कामगारांची मानसिकता इथपर्यंत या जगाचा धांडोळा यात घेतलेला आढळतो.

****

विशेष म्हणजे काफ्कानं मांडलेल्या तत्वज्ञानाशी सत्ताकेंद्र आणि सामान्य माणूस यातला संघर्ष लेखिकेनं उलगडून दाखवला आहे. लेखिकेच्या शब्दात सांगायचं तर :

"फ्रँझ काफ्कानं प्रागमध्ये १९२० च्या सुमारास आपलं लेखन केलं. अस्तित्ववादाच्या तत्वज्ञानावर आधारित त्याचं लिखाण किर्केगार्ड आणि नित्शेच्या विचारानं प्रभावित झालेलं होतं. काफ्काच्या दृष्टिकोनातून प्रत्येकजण आपली उपेक्षा करणा–या आणि सतत आपल्या विरोधात ठाकलेल्या जगात संघर्ष करत असतो. हा संघर्ष कधीच संपत नाही पण तो निराशाजनक विचारांच्या पार्श्वभूमीवर सातत्यानं करत रहायला हवा. त्याच्या उपहासगर्भ शोकांतिका या आधुनिक औद्योगिक जगात पुराणकथांचं काम करतात. अनियंत्रित सत्ता असलेल्या व्यवस्था आणि त्यात अडकलेल्या व्यक्ती यांच्यातलं नातं त्याच्या कथा दाखवतात.

आज तात्पुरती कामं करणारे कामगार आणि मोबाईलफोनवर असलेली ॲप्स नियंत्रित करणारे अल्गॉरिदम्स यांच्यातलं नातं, शंभर वर्षं होऊन गेल्यानंतरही काफ्काच्या कथांमधून सांकेतिकपणे दिसतं. आज या कामगारांच्या प्रत्येक

कृतीचं ज्या माणसांना ते पहातही नाहीत, त्यांच्याकडून मूल्यमापन केलं जातं. जे मूल्यमापन करण्याचे नियम त्या कामगारांना ठाऊकही नसतात. यातला क्रूर विनोद म्हणजे काफ्का हे खरोखर एका सॉफ्टवेअरचं नाव आहे जे दरक्षणी डेटा गोळा करुन त्यावर प्रक्रिया करतं आणि बिग डेटाचं विश्लेषण करायला कंपन्यांना मदत करतं.

अल्गॉरिदम्स ही गणितातली समस्या टप्प्याटप्प्यानं सोडवण्याची पध्दत आहे. स्मार्टफोन्स आणि इंटरनेटच्या युगाआधी हजार वर्षांपूर्वी होऊन गेलेला पर्शियन विद्वान मुहम्मद इब्न मुसल अल–ख्वारिझ्मी यानं ती शोधली होती. अल्गॉरिदम हा शब्द खरं तर त्याच्या नावातल्या शेवटच्या शब्दांचा लॅटिन अपभ्रंश आहे.asangh

प्लॅटफॉर्म्सच्या दृष्टिकोनातून अल्गॉरिदम्स हे नियम, संकेत आणि डेटा याद्वारे प्लॅटफॉर्म्सच्या कामावर नियंत्रण ठेववतात आणि प्रत्येक टप्प्यावर साधकबाधक निर्णय घेतात. तिथे काम करणा–या टेक्नोक्रॅटसशिवाय त्यात ओतलेलं लॉजिक कोणालाच ठाऊक नसतं.

कामगारांच्या बाबतीत अल्गॉरिदमचं प्रमुख काम, हे – ग्राहकांना हवी असलेली सर्व्हिस उत्कृष्टपणे कोण पार पाडू शकेल तो कामगार शोधणं – हे असतं. रेस्टॉरंट किंवा किराणा मालाची ग्राहकाची ऑर्डर कमीत कमी वेळेत उचलून पोचवू शकणारा सर्वात जवळ असलेला कामगार कोणता ते अल्गॉरिदम्स शोधतात.

“अल्गॉरिदम्सच्या दृष्टिकोनातून – पोचवायची वस्तू स्वीकारुन ग्राहकापर्यंत पोचवण्यात पहिला आणि शेवटचा असे दोन टप्पे असतात. पहिल्या टप्प्यात, डिलीव्हरी करणारा एखाद्या रेस्टॉरंटमधून किंवा दुकानातून पॅकेज घेण्याची ऑर्डर स्वीकारतो. रेस्टॉरंटमध्ये पोचायचे त्याला पैसे मिळत नाहीत. त्यानं ऑर्डर असलेली वस्तू स्वीकारल्यानंतर ग्राहकाकडे निघाल्यानंतर त्याला किती पैसे मिळणार याचं गणित सुरु होतं.

अल्गॉरिदम्स हे त्या कामगाराच्या मार्गातला पहिला मैल हा शेवटच्या मैलापेक्षा छोटा असेल याची काळजी घेणारे बनवलेले असतात. म्हणजे रेस्टॉरंटच्या सर्वात जवळ असलेला डिलिव्हरी करणारा माणूस निवडला जाईल अशी ती रचना असते. मात्र गर्दीच्या वेळात जर डिलीव्हरी करणारा कामगार जवळपास सापडत नसेल तर ॲप जरा दूरवर असलेला कामगार शोधतात.

****

स्विगी आणि झोमॅटोत काम केलेल्या राजेश सिंग यांनी या ॲपचं लॉजिक काय आहे हे शोधायचा प्रयत्न केला आणि ही ॲप्स वयस्कर कामगारांबाबत भेदभाव करतात हे दिसून आलं. हे उदाहरण या पुस्तकात आहे.

राजेश सिंग म्हणतात, ”सुरुवातीच्या काळात कंपनी तुम्हाला खूप पळायला लावते. तुम्हाला खूप ऑर्डर्स मिळतात. आजूबाजूला पन्नासजण असतील तर नवीन कामगाराचाच फोन वाजतो. मग तुम्हाला छान वाटतं. तुम्ही बारा, तेरा, चौदा तास काम करतात. ऑर्डर्स घेत रहाता.. रेस्टॉरंटसमागून ग्राहकांपर्यंत वाहन चालवत रहाता. त्यातून प्रकृतीवर अर्थातच परिणाम होतो. माझं वजन या प्रकारात खूप घटलं. पण मग नंतर काही काळानंतर तितकेच किंवा त्यापेक्षा जास्त तास काम करुन आठवड्याला पैसे मात्र कमी (आधी २०,००० मिळत असतील तर ते १६ हजार किंवा १० हजार इथपर्यंत खाली येत गेले.) मिळायला लागल्याचं लक्षात आलं. मला पूर्वीइतक्या ऑर्डर्स मिळत नव्हत्या.”

राजेश सिंगसारख्या असंख्य गिग वर्कर्सची समस्या हीच आहे, ती म्हणजे त्यांच्या रोजच्या जगण्यात त्यांना समजतही नाही असं खूप जास्त काहीतरी घडत असतं. सर्वज्ञ, सर्वव्यापी आणि सर्वशक्तिमान असलेला अल्गॉरिदम अदृश्य असला तरी अंतर्यामी म्हणजे सर्व जाणणारा असतो. कामगारांना या डिजिटल अंतर्यामी ॲप्सचं कामकाज कसं चालतं ते माहितीही नसतं.

ग्राहक म्हणून या कामगारांच्या दुनियेचा विचार आपण केलेला नसतोच. पण जागतिक पातळीवरही असंघटित कामगारांच्या समस्यांमध्ये ही अजून एक दुर्लक्षित, उपेक्षित बाजू आहे.

(लेखिका संवेदनशील व अभ्यासू लेखिका कार्यकर्ती आहे.)

8411000706

खरा तो एकाची धर्म, जगाला प्रेम अर्पावे
– साने गुरुजी

चर्चा

भावांचे ऐक्य...

सुनील सांगळे

विषय तसा आता थोडा जुना झाला, पण तो एकदम ताजा असताना अतिउत्साहात वाहवत जाण्यापेक्षा काही दिवस झाल्यावर जास्त चांगले आकलन होते असे वाटते. खरे तर दोन भावांनी एकत्र यावे याचा एवढा मोठा गवगवा का झाला? सत्ताधारी कबूल करणार नाहीत, पण फार मोठ्या प्रमाणावर सर्वसामान्य जनतेचे लक्ष या गोष्टीवर लागून राहिले होते आणि म्हणून ती सभा फार मोठ्या प्रमाणात टीव्हीवर पाहिली गेली. याचे कारण काय असेल?

याचे साधे कारण हे दिसते की, आज महाराष्ट्राच्या राजकीय अवकाशात एका प्रबळ विरोधी पक्षाची आत्यंतिक गरज आहे. आज परिस्थिती अशी आहे की उबाठा जर सत्तेत सामील झाली तर सध्याचे सरकार जवळजवळ सर्वपक्षीय सरकार होईल. राक्षसी बहुमत आणि त्यातून येणारा माज रोजच्या बातम्यात सगळ्यांना दिसत आहे. दोन मोठया पक्षात उभ्या फुटी घडवून आणल्यावर ते दुर्बल झाले आहेत आणि त्यामुळे सत्ताधाऱ्यांना जनतेला उत्तरदायी असण्याची गरजच उरलेली नाही. लोकांना हे उघड्या डोळ्यांनी दिसत आहे आणि त्यावर एकच उपाय आहे, आणि तो म्हणजे सत्ताधारी आघाडीच्या विरोधात एक थोडीफार तरी ताकद असलेला विरोधी पक्ष असणे.

काँग्रेस ही जागा घेईल असे सध्यातरी दिसत नाही. या देशातील जनतेला पक्षाचा चेहरा म्हणून एखादा नेता लागतोच. राज्यपातळीवर काँग्रेसकडे कोणीही लोकप्रिय नेता नाही. राष्ट्रवादीची जवळपास तीच अवस्था आहे. त्यांच्यातील सगळे वजनदार नेते सत्तेत जाऊन बसलेत आणि मोठ्या साहेबांचे आता वय झाले आहे, आणि त्यांची जागा घेणारे त्यांच्या उरल्यासुरल्या पक्षात कोणी दिसत नाही. त्यामुळे राहता राहिली सेना. त्यांचेही जवळपास सगळे नेते, खासदार, आमदार, नगरसेवक, पक्षातील छोटेमोठे नेते सत्तेच्या वळचणीला जाऊन बसलेत. पण उबाठाकडे अजूनही नेतृत्वाचा एक चेहरा आहे, आणि सत्ताधाऱ्यांना कडवा विरोध करण्याची हिम्मत दाखविणारे अनेक नेते आहेत.

त्यांचे छोटे बंधू संघटनाकुशल जरी नसले तरी त्यांच्याकडे लोकांना खेचून घेणारे वक्तृत्व आहे हे त्यांचे विरोधकही मान्य करतात. पण त्यांच्याच धरसोड धोरणांमुळे त्यांच्या राजकारणाला यश येत नाही. तेच जर मोठ्या भावासोबत गेले तर मात्र एक लोकांना खेचून आणणारा नेता आणि एक संघटना असलेला नेता असे समीकरण जुळून येऊ शकते आणि हेच कारण आहे की त्यांच्या संभाव्य युतीकडे सत्ताधारीही धास्तावून बघत आहेत. आज राजकीय अवकाशात विरोधकांची जी पोकळी आहे, ती तरी किमान हे दोघे एकत्र आले तर भरून येऊ शकेल. राष्ट्रवादी (शप) ही त्यांच्यासोबत राहील हे नक्की, पण काँग्रेस मात्र त्यांच्या देशव्यापी व्यापामुळे या युतीपासून दूर राहील असे दिसते.

आता मिलियन डॉलर प्रश्न, किंवा करोडोचा सवाल हा आहे की, हे दोघे एकत्र येतील का? याबाबत लगेच सत्ताधाऱ्यांच्या आय.टी. सेल कडून एक मिम प्रसिद्ध झाले होते की, मराठी माणसाच्या भल्यासाठी हे जर एकत्र येणार आहेत, तर मग वेगळे कोणाच्या भल्यासाठी झाले होते? हे एकवेळ सोडून देऊ. पण खरी अडचण ही आहे की, ते वेगळे का झाले होते? याचे साधे उत्तर आहे की, बॉस कोण असावा या कारणासाठी ते वेगळे झाले होते. आजही तो प्रश्न शिल्लक आहे, किंवा पुढे उद्भवणार आहेच. भूतकाळात जर त्यांना आपापले अहंकार बाजूला ठेवता आले नाहीत, तर ते भविष्यात तरी ते बाजूला ठेवू शकतील का? खरे तर त्यांनी ते बाजूला ठेवले पाहिजे आणि एकत्र आले पाहिजे. याची कारणेही साधी आहेत.

कारण एक, आज ते दोघेही आणखी काही गमवावे अशा परिस्थितीत नाहीतच. ते एकत्र आले तर, आहे त्या परिस्थिती सुधारणा होऊन दोघांनाही अधिक खासदार, आमदार (मनसेकडे तर आमदारच नाही), नगरसेवक इत्यादी मिळतील यात शंकाच नाही. त्यामुळे अगदी स्वार्थाचा जरी विचार केला तरीही त्यांच्या दृष्टीने त्यांनी एकत्र येणे यात त्यांचाच फायदा आहे.

या विषयात त्यांनी भाजपचा धडा घ्यावा. अत्यंत ताकदवान पक्ष असतांनाही, केंद्रात सरकार असतांनाही, त्यांनी चक्क दोन मोठे पक्ष सोबत घेऊन त्यांच्याबरोबर सत्तेची सगळी पदे वाटून घेतली आहेत. त्यापायी त्यांना स्वत:च्या पक्षातील अनेक लोकांना नाराज करावे लागले आहे तरी त्यांनी त्याची पर्वा केलेली नाही. ही गोष्ट सोपी नक्कीच नाही. मोठी महत्वाची मंत्रीपदे, मलई देणारी खाती, महामंडळे, इत्यादी आपल्या लोकांना न देता, युतीतील पक्षांना देणे सोपे नाही. पण दीर्घकालीन भविष्याकडे नजर ठेवून आणि त्यासाठीचा पराकोटीचा संयम बाळगून त्यांनी ते केलेले आहे. पुढे याच युतीतील पक्षांना ते नेस्तनाबूत करणार यात कोणालाही शंका नाही. ते तसा प्रयत्न करतील याची खात्री तर त्यांच्या सोबत गेलेल्या पक्षांनाही असेल. पण ते आज आपल्याला काय मिळत आहे त्यावर खुश आहेत.

त्या तुलनेत हे दोन बंधू जर आपापले अहंकार बाजूला ठेवून, किंवा काही तडजोडी करून जर एकत्र आले तर, आता नाही, पण पुढील विधानसभा निवडणुकात तरी त्यांना यश मिळू शकते. जनतेला कायम एक पर्याय उपलब्ध असावाच लागतो. आज जे सत्तेवर आहेत, त्यांच्याविरुद्ध अनेक कारणांनी जर असंतोष निर्माण होतच राहिला, तर केवळ समोर पर्याय नाही, या कारणानेदेखील तेच सत्ताधारी निवडून येतात. आज केंद्रात आपण ते पाहतोच. आज हातात फारसे काही नाही, परंतु दीर्घकालीन भविष्याचा विचार करून संयम ठेवला, तर पुढे जनतेला एक पर्याय खुला असल्याचा फायदा होऊ शकतो याचा विचार दोघांनीही केला पाहिजे. उद्या सत्ता मिळाली (जे लगेच शक्य नाही) तर या दोन पक्षात आज असे किती वजनदार नेते आहेत, ज्यांना मोठी खाती मिळणार नाहीत? आज ही खाती सत्तेतील तीन पक्षातील मोठ्या वजनदार नेत्यांनी वाटून घेतलेली आहेत, ती या दोन पक्षातीलlight weight नेत्यांचे समाधान करायला कमी पडणार आहेत का? त्याशिवाय खासदारकी, आमदारकी, नगरसेवक, ढिगाने पडलेली महामंडळांची अध्यक्षपदे, इत्यादी गोष्टी असतातच.

प्रश्न फक्त संयम ठेवण्याचा आहे आणि दीर्घकालीन राजकारण करण्याचा आहे. तेवढा संयम जर त्यांच्याकडे नसेल तर मग आज जे एकाधिकारशाहीसारखे सरकार राज्यात आहे ते तसेच सुरु राहील यात शंका नाही. घड्याळाचे काटे उलटे फिरविण्याची प्रयत्न कधीच सुरु झालेत. आता तर संविधानातील'धर्मनिरपेक्ष' आणि 'समाजवाद' हे शब्द काढण्याबद्दल चर्चा सुरु केली जात आहे, आणि ती ही सत्ताधाऱ्यांच्या सर्वोच्च हायकमांडकडून ! अशा परिस्थितीत 'सनम हम तो डुबेंगे, लेकिन आप को भी लेकर डुबेंगे' असे वर्तन ठेवावे की नाही याचा विचार विरोधी पक्षातील सगळ्यांनीच करायचा आहे.

९ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट : सामाजिक सलोखा सप्ताह !
सहभावाची स्नेहभावाची बांधुया राखी !!
बनुया शांतीदूत अर्थात अमन के सिपाही !!!

समाजात शांतता आणि सौहार्द राखण्यासाठी जनआंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय (NAPM) च्या सद्भाव मंचा तर्फे काही कृती कार्यक्रमांतून सहिष्णुता आणि धर्मनिरपेक्षतेची ताकद उभी व्हावी, असा प्रयत्न आपण करूया. त्यासाठी राज्यभर सर्वत्र ९ ऑगस्ट - क्रांती दिन व आंतरराष्ट्रीय आदिवासी दिन ते १५ ऑगस्ट - स्वातंत्र्य दिन या काळात सामाजिक सलोखा सप्ताह साजरा करावा यासाठी NAPM महाराष्ट्र काही कृती कार्यक्रम सुचवत आहे.

९ ऑगस्टच्या दिवशी राखीपौर्णिमेच्या निमित्ताने सहभाव जपूया स्नेहभाव वाढवूया असा संदेश देणारा स्नेहबंध कार्यक्रम आयोजित करता येईल. गाव व वस्ती पातळीवरील या कार्यक्रमात स्नेहभावाची राखी बांधून सर्वच सामाजिक स्तरांवर सहभाव वाढवता येईल. स्नेहबंधाचे कार्यक्रम वैयक्तिकरित्याही होऊ शकतील तसेच शाळा, महाविद्यालये, वस्त्या तसेच अन्य जाती, धर्म, वर्ग, लिंग, प्रदेश, भाषा यांच्या रहिवासाच्या ठिकाणी होऊ शकतील. विशेषत: सामाजिक संस्थांनी, शाळांनी हे उपक्रम आयोजित केले तर ते खूप परिणामकारक ठरेल.

या सप्ताहा दरम्यान शांतीदूत अर्थात अमन के सिपाही, या शिर्षकाखाली पथनाट्य, सायकल रॅली, पदयात्रा, संगीताचे कार्यक्रम असे सामूहिक कार्यक्रम गाव व वस्तीपातळीवर आयोजित करता येतील.

१५ ऑगस्टच्या निमित्ताने होणाऱ्या विशेष ग्रामसभेत सामाजिक सलोख्याचा ठराव पारित व्हावा यासाठी प्रयत्न करावेत. त्याचबरोबर आपापल्या शाळेत, महाविद्यालयात, संस्थेत, हाऊसिंग सोसायटीमध्ये, वस्त्यांमध्ये झेंडावंदनाच्या वेळी असा ठराव किंवा संकल्प करावा.

- **सद्भाव मंच**, जनआंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय, महाराष्ट्र

राजकीय भूकंप आणणारा तिशीचा तरुण

डॉ. प्रदीप आवटे

जोहरान ममदानी वय वर्षे ३३. या तरुणाची सध्या अमेरिकेत आणि जगभर प्रचंड चर्चा सुरु आहे. येत्या नोव्हेंबरमध्ये तो न्यूयॉर्क शहराचा महापौर होऊ शकतो. डेमोक्रॅटिक पक्षाची उमेदवारी मिळवण्यासाठी आवश्यक प्राथमिक फेरी त्याने मोठ्या फरकाने जिंकल्यात जमा आहे. या प्रायमरीसाठी त्याने जी राजकीय मोहीम चालवली तिने निव्वळ न्यूयॉर्क शहरच नाही तर पूर्ण अमेरिकेचे राजकारण ढवळून काढले आहे. अमेरिकेच्या विद्वान अध्यक्षांना वेळ काढून त्याच्यावर टीका करणारे ट्विट करावे लागले यातच काय ते आले. ते तर या तरुणावर एवढे चिडले आहेत की त्यांना हा मुलगा पागल, कम्युनिस्ट अतिरेकी, दिसायला ऐकायला कसनुसा वाटतो पण त्यावर जोहरान अत्यंत सुस्पष्टपणे आपण कम्युनिस्ट नाही हे स्पष्ट करतो आणि मार्टिन ल्युथर किंग ज्युनियर यांचं हे एक वाक्य म्हणजे माझ्यासाठी प्रेरणा आहे असं सांगतो. ते वाक्य म्हणजे, "Call it democracy, or call it democratic socialism, but there must be a better distribution of wealth within this country for all of God's children."

या निवडणुकीने केवळ अमेरिकेतीलच नव्हे तर जगभरातील प्रस्थापित राजकारण ढवळून निघाले आहे. या निमित्ताने त्याने शहरीकरणाने निर्माण केलेल्या अनेक प्रश्नांना हात घातला आहे. न्यूयॉर्क शहरात घरभाडी सर्वसामान्य लोकांच्या क्षमतेबाहेर गेली आहेत. त्यावर हा तोडगा घेऊन येतो. रोज लागणाऱ्या घरगुती किराणा गोष्टी इतक्या महागल्या आहेत त्यावर तो सरकारी योग्य दरातील ग्रोसरी शॉप स्कीम मांडतो आहे. हे म्हणजे शासन व्यवस्थेला पुन्हा एकदा लोककल्याणकारी मार्गावर घेऊन जाणे, वेलफेअर स्टेटचे मोडीत निघालेले मॉडेल तो पुन्हा मांडतो आहे. शहरातील बस सेवा पूर्ण मोफत करणे, मेट्रो दर कमी करणे, ट्रॅफिक जाम कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना. मोफत बाल आरोग्य सुविधा. अशा अनेक बाबींवर तो बोलतो आहे. खरे तर हे सारे प्रश्न आपल्याही शहरांसमोर आहेत. शहरातील सर्व स्तरातील लोकांशी बोलून त्यांचे प्रश्न समजावून घेऊन तो हे बोलतो आहे. बंगाली, हिंदी, गुजराती, इंग्रजी अशा जवळपास बारा भाषांत तो लोकांशी संवाद साधतो आहे. डेमोक्रॅटिक सोशलिस्ट असोसिएशनचा सदस्य असणारा जोहरान अमेरिकन राजकारणाला समाजवादी दिशा देतो आहे. आरोग्य, शिक्षण, रोजगार यांच्या मुद्द्यावर बोलतो आहे.

राजकारणी म्हटलं की पॉप्युलिस्ट भूमिका घेणे, वेगवेगळ्या जात धर्म वंशाच्या लोकांना काही क्लृप्त्या वापरून खुश करणे असले काहीच तो करत नाही आहे. स्वत: मुस्लिम असताना आणि अमेरिकेत, जगभर इस्लामोफोबिया वाढत असताना स्वत:ची ओळख न लपवता हा तरुण पोर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवर अगदी रोखठोक, प्रामाणिक भूमिका घेतो आहे. न्यूयॉर्क शहरात ज्यू नागरिकांचे प्रमाण मोठे आहे. इथले मोठे उद्योग त्यांच्या ताब्यात आहेत. आणि तरीही इस्त्राईल विरोधी भूमिका घ्यायला जोहरान अजिबात कचरत नाही. इस्त्राईल गाझामध्ये जे करते आहे तो वंशसंहार आहे आणि तेथील पंतप्रधान जर आमच्या शहरात आले तर आम्ही त्यांना अटक करु. आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार त्यांच्याविरुद्ध खटला चालला पाहिजे, हे तो स्पष्टपणे बजावतो. आणि तरीही बरेच ज्यू नागरिक देखील त्याच्यासोबत उभे राहतात. अमेरिकेच्या वर्तमान अध्यक्षांना खुलेआम हुकुमशहा म्हणतो.

जे योग्य ते योग्य, जे चुकीचे ते चुकीचे. मतपेटी चुचकारण्यासाठी जोहरान कुठेही बोटचेपी भूमिका घेत नाही. त्याच्या सभांना जी गर्दी होते आहे तेवढी तर अध्यक्ष महोदयांच्या सभेलाही होत नाही, अशी अवस्था! या तरुणाने अमेरिकेत राजकीय भूकंप आणला आहे, अशा शब्दांत द गार्डियन त्याचे कौतुक करते. ज्या उमेदवारांच्या पाठीमागे भांडवलशाही व्यवस्था उभी आहे, जो स्वत: प्रचंड श्रीमंत आहे अशा उमेदवाराला मोठ्या

(पान २७ वर)

टिप्पणी

गांधीवादी संस्थांवर मुख्यमंत्र्यांचे बेछूट आरोप

वर्धा येथील गांधीवादी संस्थांवर माओवाद्यांशी संबंध असल्याचे निराधार बेजबाबदार आरोप भाजप च्या मंत्र्यांनी केले आणि त्याला मुख्यमंत्र्यांनी दुजोरा दिला, याबद्दल सर्व गांधीवादी संस्थांनी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून तात्काळ खुलासा करण्याचे आवाहन केले आहे.

दिनांक: १६ जुलै २०२५

प्रति,
मा. मुख्यमंत्री महोदय,
महाराष्ट्र राज्य

सप्रेम जय जगत !

आर्वी मतदारसंघातील भारतीय जनता पक्षाचे आमदार श्री. सुमीत वानखेडे यांनी वर्धा येथील गांधीवादी संस्थांमध्ये माओवादी विचारधारेच्या लोकांचा संबंध व त्यांचे येणे–जाणे असल्याचा आरोप केला आहे. आपल्या आमदारांच्या या वक्तव्याला आपणही दुजोरा देत तपास करण्याची घोषणा केली आहे.

आपण आणि आपल्या आमदाराने केलेले हे विधान ऐकून आम्हाला खूप आश्चर्य वाटले. महाराष्ट्रासारख्या प्रगतशील राज्याचे मुख्यमंत्री एवढे गैरजबाबदार आणि निराधार विधान करतील, हे अपेक्षित नव्हते. आपण आपल्या विधानात ६२ संस्थांचा उल्लेख केला आहे. परंतु आपण त्या संस्थांची नावे जाहीर केली असती, तर आपल्या पदाला साजेसे ठरले असते आणि जनतेमध्ये निर्माण झालेली संभ्रमाची स्थितीही टळली असती. आपण मुख्यमंत्री आहात, त्यामुळे संबंधित सर्व माहिती आपल्या जवळ असणे अपेक्षित आहेच. मात्र आपल्या या भ्रामक विधानामुळे देशभरातील गांधीवादी संस्थांबद्दल जनतेमध्ये शंका व अविश्वास निर्माण होण्याची शक्यता आहे.

महात्मा गांधींनी आम्हाला मानवतेचे मूल्य, अहिंसा, जबाबदारीचे शासन, शेवटच्या माणसाच्या बाजूने उभे राहण्याची शिकवण दिली. आम्ही ती शिकवण जगत आलो आहोत आणि यापुढेही तसेच करत राहू. आम्ही कालही हुकूमशाही विरोधातउभे होतो, आजही आहोत आणि उद्याही राहू. हा आमचा संकल्प आणि कर्तव्य आहे.

ज्यांचा आपण आपल्या विधानात उल्लेख केला, त्या ६२ संस्थांची नावे व त्यांचा माओवादी संपर्काबाबत प्रशासनाकडे जी काही माहिती असेल ती कृपया तात्काळ जनतेसमोर सादर करावी. या पत्राद्वारे आम्ही आपल्याला खात्री देतो की गांधीवादी संस्थांचा माओवाद्यांशी कोणताही संबंध कधीच सिद्ध होणार नाही.

आम्ही हिंसेच्या आणि टोकाच्या, कट्टर विचारधारांच्या विरोधात आहोत मग ती उजव्या विचारसरणीची असो वा डाव्या विचारसरणीची.

माओवाद्यांशी संबंध असल्याच्या आरोपांची कोणतीही चौकशी झाली तरी आम्ही सहकार्य करण्यास तयार आहोत. आम्ही आजवरही सत्य, अहिंसा आणि न्यायाच्या बाजूने भूमिका घेतली आहे आणि म्हणूनच कदाचित सत्तेला आमचे अस्तित्व अस्वस्थ करणारे वाटते.

शेवटी, आमची आपणास विनंती आहे की आपण आपले विधान खरे असल्याचे प्रमाण सार्वजनिकरित्या सादर करावे, अन्यथा आपण त्वरित आपल्या विधानाला मागे घ्यावे.

विनीत,
गांधी विचाराच्या संस्थांचे प्रतिनिधी:

१) चंदन पाल अध्यक्ष, सर्व सेवा संघ, सेवाग्राम
२) आशा बोथरा अध्यक्ष, सेवाग्राम आश्रम प्रतिष्ठान
३) डॉ. प्रभाकर पुसदकर मंत्री, नई तालीम समिति, सेवाग्राम
४) डॉ. विभा गुप्ता अध्यक्ष, मगन संग्रहालय, वर्धा
५) ॲड. अविनाश काकडे मंत्री, सर्व सेवा संघ, सेवाग्राम
६) अनिल फरसोले मंत्री, गांधी सेवा संघ, सेवाग्राम

(पान २७ वर)

आघाडीवर

वारीतील पुरोगामींबद्दल अफवा पसरवणे थांबवा!

शामसुंदर महाराज सोन्नर

एक दिवस तरी वारी अनुभवावी आणि संविधान समता दिंडी विषयी पसरवण्यात येत असलेल्या अफवा आणि गैरसमजाबाबत कार्यकर्त्यांनी पुढील खुलासा केलेला आहे.

१) भारतीय संविधानाचे अमृतमहोत्सवी वर्ष आपण साजरे करीत आहेत. आपल्या भारतीय संविधानात संत, समाजसुधारकांच्या विचारांचे प्रतिबिंब उमटले आहे. भारतीय संविधानात व्यक्त झालेला समतेचा विचार भागवत धर्माच्या वारकरी परंपरेतून आलेला आहे. संतविचार आणि संविधानिक मूल्ये ही परस्परांना पूरक आहेत. संविधानाला अभिप्रेत असणारी समता संतानी त्यांच्या विचारातून सातत्याने मांडली आहे. 'यारे यारे लहान थोर, याती भलते नारी नर' असे तुकाराम महाराजांनी त्यांच्या अभंगातून मांडून ठेवले आहे. संतांचे पाईक असलेले वारकरी यांच्यापर्यंत हा परस्परपूरक विचार अभंग, प्रवचन, कीर्तन या माध्यमातून पोचविणे आणि त्यातून संतांचे व संविधानाचे नाते अधिक वृद्धिंगत करणे हा उद्देश या 'एक दिवस तरी वारी अनुभवावी' आणि 'संविधान समता दिंडी'चा आहे. यासाठी विविध संघटना, संस्था व मान्यवर एकत्र येऊन महाराष्ट्राच्या सर्वात मोठ्या वारीच्या सांस्कृतिक सोहळ्यात सहभागी होत असतात.

२) भारतीय संविधानातील मूल्ये आणि संतविचार हे सर्वसामान्य लोकांपर्यंत घेऊन जाण्यासाठी मागील १२ वर्षांपासून 'एक दिवस तरी वारी अनुभवावी' आणि मागील ७ वर्षापासून 'संविधान समता दिंडी' सुरू आहे. वारी परंपरेला कोणतीही बाधा न आणता आमचे हे दोन्ही उपक्रम सुरू आहेत. पंढरपूरकडे निघालेल्या जगद्गुरू तुकोबांरायांच्या पालखी सोहळ्यात यंदा मंगळवार २४ जून २०२५ रोजी यवत ते वरवंड या मार्गावर 'एक दिवस वारी' झाली. तसेच संविधान समता दिंडी शनिवार २१ जून २०२५ रोजी समताभूमी, पुणे (महात्मा फुलेवाडा) येथे प्रस्थान कार्यक्रम होऊन संतभूमी, पंढरपूरकडे दिंडी मार्गस्थ झाली आहे.

३) संविधानाचा विचार मान्य नसलेले काही लोक समाजात आहेत. त्या लोकांना संत विचारातील प्रेम, करुणा, मानवता मानवत नाही. ते लोक वारी आणि वारकरी संप्रदाय परंपरेला अनिष्ट सनातनी वैदिक ब्राह्मणी धर्मात बंदिस्त करू पाहत आहेत. संतांच्या व्यापक, समतेच्या आणि बंधुतेच्या विचारांना नाकारणारे हे लोक विकृतीने ग्रस्त होऊन कार्यरत आहेत. हेच लोक 'एक दिवस तरी वारी अनुभवावी' आणि 'संविधान समता दिंडी'ला विरोध करत आहेत. 'संविधान समता दिंडी' आणि 'एक दिवस तरी वारी अनुभवावी'वर टीका करताना'अर्बन नक्षल' या सहज सोप्या आणि पुरावा देण्याची कोणतीही अट नसलेल्या संकल्पनेचा वापर केला जात आहे. इतकेच नव्हे तर या टीकेच्या माध्यमातून हे लोक इतक्या महत्वाच्या संवैधानिक राष्ट्रीय कार्यामध्ये विघ्न घालू पाहत आहेत. संतांच्या काळात संत ज्ञानेश्वर माऊली, संत तुकाराम महाराज, संत नामदेव महाराज, संत चोखोबा महाराज, संत जनाबाई महाराज यांना त्रास देणाऱ्या मंबाजीसारख्या प्रवृती आजही समाजात वावरत आहेत.

४) विद्वेषाच्या विकृतीने ग्रस्त झालेली ही मंडळी, ज्या लोकांची किंवा संघटनांची अर्बन नक्षलवादी म्हणून नावे घेत आहेत, असे कोणीही 'एक दिवस तरी वारी अनुभवावी' आणि 'संविधान समता दिंडी' आयोजनात नाहीत. किंबहुना अशा लोकांचा किंवा संघटनांचा आमच्या आयोजनात संबंध नाही. याउलट संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्याचे चोपदार ह. भ. प. राजाभाऊ चोपदार, ज्येष्ठ कीर्तनकार ह. भ. प. ज्ञानेश्वर महाराज वाबळे, कैकाडी महाराज मठाचे अधिपती ह. भ. प. भारत महाराज जाधव, ह. भ. प. धम्मकीर्ती महाराज आदी मंडळी या संविधान दिंडीत सहभागी होत असतात.

५) भारतीय संविधानाला अभिप्रेत राष्ट्र उभारणी व संवर्धनाच्या चांगल्या विचाराला आणि उपक्रमाला थांबविण्यासाठी आणि आपली राजकीय सांस्कृतिक पोळी भाजून घेण्यासाठी हे विकृत लोक समाजाची दिशाभूल करून समाजात

द्वेष आणि अशांतता तयार करत आहेत. समाजात भांडणे लावण्याचे काम या लोकांनी हाती घेतले असून ते लोक खोटे आरोप करीत आहेत. त्यासाठी अफवा पसरविण्याचा प्रयत्न केला जात आहे. अशा समाजविघातक प्रवृतींचा बंदोबस्त करावा लागेल. हे लोक 'एक दिवस तरी वारी अनुभवावी' आणि 'संविधान समता दिंडी'ला बदनाम करून स्वत:च समाजात दुही माजवतील. तसेच हेच लोक वारीमध्ये अनिष्ट प्रकार करतील आणि त्याचा पुन्हा 'एक दिवस तरी वारी अनुभवावी' आणि 'संविधान समता दिंडी'वर आरोप लावतील, अशी आम्हास त्यांच्या जाहीर वक्तव्यावरून, बोलण्यावरून शंका येत आहे. त्यांचे आजवरचे वर्तनव्यवहार पाहिल्यास समाजात अशांतता निर्माण करणे, समाजाची दिशाभूल करणे, अशी त्यांची प्रवृत्ती राहिली आहे.

सदर प्रवृत्तींची आणि अशा लोकांची चौकशी करावी, त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करुन त्यांना वेळीच थांबवावे, यासंबंधी आम्ही शासन प्रशासनाला पत्रव्यवहार केला आहे.

निवेदक: हभप शामसुंदर महाराज सोन्नर, हभप हरिदास महाराज तम्मेवार, हभप भारत महाराज घोगरे, हभप समाधान महाराज देशमुख, अविनाश पाटील, ॲड. वर्षा देशपांडे, नागेश जाधव, राजाभाऊ अवसक, साधना शिंदे, व सहकारी

९८९२६७३०४७

(जगभर: पान २४ वरुन)

फरकाने पराभूत करत हा पोरगा पुढे निघाला आहे.

भारतीयांच्या आनंदाची बाब म्हणजे जोहरान हा सलाम बॉम्बे, मिसिसिपी मसाला अशा चित्रपटांच्या प्रसिद्ध दिग्दर्शक मीरा नायर यांचा मुलगा आहे. त्याचे वडील मोहम्मद ममदानी हे गुजराती मूळ असणारे आणि युगांडामध्ये वाढलेले नामवंत अॅकॅडमिशीयन आहेत. त्याहून आनंदाची गोष्ट म्हणजे आजच्या काळात जगभरातील अवघे राजकारण एकारलेलं, संकुचित, युद्धज्वर वाढविणारे असे होत असताना आंतरराष्ट्रीय परिस्थितीचे नेमके भान ठेवत मानवकेंद्री, जमिनीवरील मुद्द्यांना आत्मीयतेने स्पर्श करणारे नवे राजकारण जोहरान ममदानीच्या रूपाने पुन्हा एकदा आकाराला येताना दिसत आहे. अनेकजण त्याला नवा ओबामा म्हणत आहेत. अनेकांना तो ओबामांच्याही दोन पावले पुढे आहे, हे जाणवते आहे.

अर्थात सगळेच आलबेल चालले आहे अशातला भाग नाही जोहरानच्या धर्मावरून त्याला ट्रोल करणारे खूप जण आहेत. कुणी त्याच्या कारवर बॉम्ब टाकून उडवू इच्छिते, कुणी त्याला छोटा मोहम्मद म्हणते, न्यूयॉर्कसाठी तो डेंजरस आहे म्हणते, त्याचे नागरिकत्व काढून घेऊन त्याला देशाबाहेर हाकलून दिले पाहिजे, असे म्हणते. जोहरान निराश होत नाही आणि पण त्याला खूप वाईट वाटते. हा द्वेष मावळावा, म्हणून आपल्याला काम करावे लागेल असे सांगतानाच हे मूठभर लोक म्हणजे संपूर्ण अमेरिका नाही, हेही आपल्याला त्यांना दाखवून द्यावे लागेल. मला या धमक्यांची भीती वाटत नाही असे नाही कारण त्या धमक्या माझ्या प्रिय व्यक्तींसाठी देखील आहेत. पण माझे न्यूयॉर्क वर प्रेम आहे. इथे मी लहानाचा मोठा झालो आहे. हे शहर सर्वासाठी सुरक्षित, परवडणारे आणि आनंददायी व्हावे, यासाठी प्रयत्न करणे हेच या धर्मांधतेवर उत्तर आहे. आपल्या जगण्याला अर्थ देणाऱ्या खऱ्याखुऱ्या राजकारणात सर्वांनी सहभागी होणे, हेच या सगळ्यावरील समाधान आहे. अवघ्या तिशीतील या तरुणाची परिपक्वता, समंजसपणा आपल्याला थक्क करतो. सोशल मीडिया वापरातील त्याची कल्पकता अफलातून आहे.

आपण आणि आपल्या तरुण पिढीने त्याच्याकडून खूप काही शिकण्यासारखे आहे. आपले शहर हे सर्वसामान्य कष्टकरी, कामकरी लोकांसाठी परवडणारे शहर व्हावे, यासाठी धडपडणारा जोहरान आपल्या शहरांनाही हवा आहे. आणि खरे म्हणजे आपल्या राजकारणात पूर्वीची कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसणारे असे नवतरुण का येऊ शकत नाहीत, याचाही विचार आपण गांभीर्याने करायला हवा.

9423337556

(टिप्पणी: पान २५ वरुन)

७) रमेश दाने अध्यक्ष, प्रदेश सर्वोदय मंडळ, महाराष्ट्र
८) अतुल शर्मा - सदस्य, ग्राम सेवा मंडळ, वर्धा
9) डॉ. तारक काटे - अध्यक्ष, धरामित्र गोपुरी वर्धा
10) अशोक बंग अध्यक्ष, चेतना विकास वर्धा
11) सुदाम पवार - अध्यक्ष, किसान अधिकार अभियान वर्धा

vtambe@gmail.com

आघाडीवर

जनसुरक्षा कायद्याला राज्यपालांनी मंजुरी देऊ नये

जनसुरक्षा विधेयकविरोधी संघर्ष समिती

राज्य सरकारच्या जनसुरक्षा विधेयक (बिल क्रमांक ३३,२०२४) ला मंजुरी देऊ नये, अशी मागणी 'जनसुरक्षा विधेयकविरोधी संघर्ष समिती'ने आज राज्यपालांकडे केली. विविध राजकीय पक्ष व लोकचळवळींच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत राजभवन येथे राज्यपाल माननीय सी. पी. राधाकृष्णण यांना निवेदन सादर करण्यात आले.व या कायद्यातील विविध मुद्द्यांवर व जाचक तरतुदी बद्दल सविस्तर चर्चा केली.

या संघर्ष समितीमध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्ष (CPI), मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष (CPI-M), भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी–लेनिनवादी) लिबरेशन, शेतकरी कामगार पक्ष, समाजवादी पक्ष, सत्यशोधक कम्युनिस्ट पक्ष, भारत जोडो अभियान, श्रमिक मुक्ती दल यांसह डावे प्रागतिक पक्ष व संघटनांचा समावेश आहे. सर्व पक्ष व संघटना संविधानाच्या चौकटीत राहून काम करत असून, या विधेयकामुळे लोकांच्या मूलभूत हक्कांवर गदा येणार असल्याचा इशारा या पक्ष–संघटनेच्या नेत्यांनी दिला आहे.

याबाबत राज्यापालांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे, की या विधेयकात वापरलेली 'अवैध कृती' व 'अवैध संघटना' यांसारखी संज्ञा अत्यंत सैल व अस्पष्ट असून, त्याचा गैरवापर करून निष्पाप नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, संघटनांचे कार्यकर्ते यांच्यावर अन्यायकारक कारवाई होऊ शकते. जनसुरक्षा विधेयकासाठी सरकारच्या संयुक्त चिकित्सा समितीकडे १२,७०० लोकांच्या प्रतिक्रिया सादर झालेल्या होत्या. ज्यापैकी ९,५०० लोकांनी विधेयक रद्द करण्याची मागणी केली होती. मात्र, लोकसुनावणी न घेता आणि केवळ तीन कलमांत किरकोळ बदल करून हे विधेयक विधानसभा व विधान परिषदेत पाशवी बहुमताच्या जोरावर घाईघाईने मंजूर करण्यात आले आहे. या कायद्याचा उपयोग शांततापूर्ण आंदोलन, सविनय कायदेभंग, मोर्चा, रास्ता रोको यांसारख्या लोकशाही मार्गांनी सरकारविरोधात आवाज उठवणाऱ्यांना दडपण्यासाठी होणार आहे, हा कायदा जनविरोधी, घटनाविरोधी असून या कायद्याचा सरकार कडून दुरुपयोगच होणार आहे असा आरोप समितीने केला. राज्यपालांनी संविधानाच्या अनुच्छेद २०० नुसार हा कायदा मंजूर न करता, विधानसभेकडे परत पाठवावा आणि पुनर्विचार व्हावा, अशी मागणी समितीने यावेळी केली.

या वर माननीय राज्यपाल यांनी समिती चे आणखी काही मुद्दे लेखी स्वरूपात स्पष्ट करण्याची सूचना अधिकाऱ्यांना दिल्या व दिलेले निवेदन काळजीपूर्वक वाचून योग्य वाटतील त्या मुद्यांवर राज्य शासनाकडे स्पष्टीकरण मागितले जाईल असे त्यांनी समितीच्या शिष्टमंडळाला सांगितले आहे.

याप्रसंगी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सेक्रेटरी कॉ. ॲड. सुभाष लांडे, राज्य सचिव मंडळ सदस्य कॉ. प्रकाश रेड्डी, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे आमदार कॉ. विनोद निकोले, भारत जोडो अभियान च्या सामाजिक कार्यकर्त्या उल्का महाजन, भाकपा (माले)चे कॉ. उदय भट, शेकापचे ॲड. राजेंद्र कोर्डे, कष्टकरी संघटनेचे ब्रायन लोबो,कॉ अशोक सुर्यवंशी,कॉ चेतन माढा,कॉ कुशल राउत उपस्थित होते.

ulkamahajan@rediffmail.com

(राजकारण: पान १९ वरुन)

त्यांचं सुशोभीकरण करणं, भव्य पुतळे कधी समुद्रात तर कधी गडांवर उभारणं वगैरे केवळ दिखाऊ गोष्टींसाठी कोट्यवधी रुपये खर्च करायचे (त्यायोगे धार्मिकतेला जोम येईल, आपली मतपेढी अधिक बळकट होईल याची तजवीज करणं), यालाच 'विकास' म्हणायचं, ही प्रथाच पडली आहे.

पोकळ वल्गना, वारेमाप (खोटी) आश्वासनं, नको त्या बाबींवर खर्च करणं आणि मूळ प्रश्नांना कधीच सामोरं न जाणं, यालाच 'विकास' म्हणायचं? एक कवितेची ओळ आहे, 'हे जीवन कसले ही मरणांची माला, मासोळी झटते तोडायास गळाला'. तर यांच्या अशा आश्वासनांना बळी पडून, त्यांच्यावर विश्वास ठेवून त्यांना निवडून देणाऱ्या जनतेचीही त्या बिचाऱ्या मासोळीसारखीच अवस्था झाली आहे. सारे जण बिचारे 'त्या योग्य वेळे'ची वाट बघत आहेत.

('अक्षरनामा'च्या सौजन्याने)

(लेखक जेष्ठ पत्रकार आहेत.)

aashriketkar@gmail.com

सरकारी रुग्णालयांच्या खासगीकरणास प्रचंड विरोध

NAPM

'रुग्णालये वाचवा, खासगीकरण थांबवा !'
"आरोग्य हा प्रत्येकाचा हक्क आहे! त्याचा व्यापार थांबवा!"
"रुग्णालये आहेत जगण्यासाठी, देणार नाही नफ्यासाठी",
"रुग्णालये आमच्या हक्काची - नाही कोणाच्या मालकीची!"

अशा अनेक घोषणा 7 जुलै 2025 रोजी मुंबईच्या मानखुर्द–गोवंडी परिसरात झालेल्या निदर्शना दरम्यान घुमल्या. एम–पूर्व प्रभाग कार्यालयाबाहेर 300 हून अधिक स्थानिक नागरिकांनी रॅली काढून, महापालिका दवाखान्याच्या खाजगीकरणाला विरोध नोंदवला. या निदर्शनात प्रमुख मागणी होती – शताब्दी रुग्णालय आणि लल्लुभाई कंपाउंड सुपर–स्पेशालिटी रुग्णालयांचे खासगीकरण तातडीने थांबवावे. "रुग्णालय वाचवा, खासगीकरण हटवा कृती समिती" च्या बॅनरखाली मुंबई एम पूर्व वॉर्ड मधील 25 हून अधिक संस्था–संघटनांनी याचे आयोजन केले होते. मुंबईत सरकारी आरोग्य व्यवस्थेत वाढत्या कॉर्पोरेट खाजगी नियंत्रणाला विरोध करणे, सार्वजनिक आरोग्य सेवांचे रक्षण आणि सुधारणा करणे, यासाठी हा मोर्चा काढण्यात आला. सध्या बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून (BMC) महत्त्वाची सरकारी रुग्णालये पब्लिक–प्रायव्हेट पार्टनरशिप (PPP) मॉडेलच्या नावाखाली, खासगी संस्थाना देण्याची प्रक्रिया राबवली जात आहे.

सर्वात गरजू लोकांसाठी असलेली आरोग्य सेवा धोक्यात

मुंबईतील गरीब, गरजू लोकांच्या हक्काच्या सरकारी आरोग्य सेवांवर हा एकप्रकारे हल्ला आहे. या लढ्याच्या केंद्रस्थानी दोन प्रमुख रुग्णालये आहेत - शताब्दी म्युनिसिपल जनरल रुग्णालय (गोवंडी) आणि लल्लुभाई कंपाउंड रुग्णालय (मानखुर्द). ही दोन्ही रुग्णालये एम पूर्व प्रभागातील लोकांना आरोग्यसेवा देतात. हा प्रभाग मुंबईच्या 'मायानगरी'त प्रचंड आरोग्य आणि सामाजिक विषमतेचे सर्वात कटू वास्तव दाखवतो. या प्रभागात मुंबईच्या एकूण लोकसंख्येपैकी फक्त 6.7% लोकसंख्या राहते, परंतु येथे शहरातील 16% पेक्षा जास्त माता मृत्यू होतात. गेल्या दहा वर्षांत क्षयरोगाच्या रुग्णांमध्ये 300% वाढ झाली आहे. 50% पेक्षा जास्त मुले कुपोषणाचे बळी आहेत. डंपिंग ग्राउंड आणि बायोमेडिकल वेस्ट प्लांटमुळे दमा आणि श्वसनाचे आजारांचे प्रमाण इथे खूप जास्त आहे.

हा असा परिसर आहे जिथे बहुतेक लोक झोपडपट्ट्यांमध्ये राहतात, रोजंदारी करतात, आणि यांना दररोज दोन वेळचे जेवणाची व्यवस्था करणे देखील कठीण आहे. अशा परिस्थितीत मोफत उपचार देणारी सरकारी रुग्णालये लाखो लोकांसाठी जीवनरेखा बनतात. परंतु BMC या सार्वजनिक संस्थांना सक्षम करण्याऐवजी, ती खाजगी कंपन्यांच्या हातात देण्याच्या तयारीत आहे. गेल्या काही वर्षांत BMC आरोग्य विभागाने सुमारे 20 पीपीपी प्रकल्प सुरू केले आहेत, ज्यामध्ये खासगी कंपन्यांना सरकारी रुग्णालयांचे संचालन, व्यवस्थापन आणि नफा कमावण्याचा अधिकार देण्यात आला आहे. ही रुग्णालये जनतेच्या कराच्या पैशातून बांधली गेली आहेत, परंतु आज त्यांच्यावर खासगी कंपन्यांचा ताबा होत आहे.

सत्ताधाऱ्यांनी निर्माण केलेले संकट

BMC चे खासगीकरण मॉडेल दोन टप्प्यांत लागू केले जाते. पहिल्या टप्प्यात सरकारी रुग्णालयांमधून डॉक्टर, परिचारिका आणि आवश्यक संसाधने कमी केली जातात, आणि व्यवस्थापनाबाबत हलगर्जीपणा केला जातो. दुसऱ्या टप्प्यात, खराब परिस्थितीचा बहाणा करून रुग्णालये पीपीपी मॉडेल अंतर्गत खासगी कंपन्यांना सोपवली जातात. BMC ने स्वत:च्या रुग्णालयांची दुरावस्था करण्याची अनेक उदाहरणे आहेत. शताब्दी रुग्णालयात आज 31% आणि देवनार मॅटर्निटी रुग्णालयात 46% पदे रिक्त आहेत. BMC च्या एकूण रुग्णालयांमध्ये सरासरी 36% पदे रिक्त आहेत. इथे हे लक्षात घेण्यासारखे आहे की मुंबई महानगर क्षेत्रात 12 वैद्यकीय महाविद्यालये आहेत, जिथे दरवर्षी 2000 पेक्षा जास्त एमबीबीएस डॉक्टर तयार होतात. BMC ही सर्व रिक्त पदे भरून सार्वजनिक आरोग्य सेवांना बळकट करू शकते. परंतु नियमित भरती, पायाभूत सुविधांचा विस्तार आणि सार्वजनिक सेवांना प्रोत्साहन देण्याऐवजी, BMC जाणीवपूर्वक कमी कर्मचारी आणि दुरावस्था

निर्माण करून खासगीकरणाला बरोबर ठरवण्याचा प्रयत्न करत आहे. BMC आणि व्यावसायिक हितसंबंधांच्या संगनमताने हे संकट निर्माण केले गेले आहे. लोकांच्या मनात सरकारी रुग्णालयांबद्दलची आपुलकी आणि विश्वास खालावत नेला जात आहे, जेणेकरून त्यानंतर त्यांना खाजगी कंपन्यांच्या हातात देणे सोपे होईल.

लोक उतरले रस्त्यावर

आता मानखुर्द आणि गोवंडीचे लोक या षडयंत्राविरुद्ध उभे राहत आहेत, आणि सुधारित सार्वजनिक आरोग्य सेवांची मागणी करत आहेत. 'रुग्णालये वाचवा, खासगीकरण थांबवा' समितीत 25 हून अधिक संस्था- संघटना सामील आहेत. यात स्थानिक नागरिक गट, कामगार युनियन्स, जन आरोग्य अभियान–मुंबईचे कार्यकर्ते, सामाजिक संस्था, प्रगतिशील राजकीय संघटना आणि महानगरपालिकेच्या आरोग्य कर्मचाऱ्यांच्या संघटना यांचा समावेश आहे. या सगळ्यांनी 7 जुलै रोजी एक मोठी रॅली आयोजित केली, जी एम पूर्व प्रभाग कार्यालयापर्यंत गेली. रॅलीत झोपडपट्टीतील रहिवासी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांनी उत्साहाने भाग घेतला.

स्थानिक रहिवाशांनी सांगितले की ते पूर्णपणे सार्वजनिक आरोग्य सेवांवर अवलंबून आहेत, परंतु आज या सेवांची स्थिती गंभीर झाली आहे, आणि त्यात सुधारणा करण्याची अत्यंत गरज आहे.

महिलांनी सांगितले की खासगीकरणाची त्यांना सर्वात जास्त भीती वाटते, कारण त्यांच्याकडे खासगी रुग्णालयात उपचार घेण्यासाठी पुरेसे पैसे नाहीत. संघटनांच्या कार्यकर्त्यांनी सांगितले की, "शिक्षण, वीज, बस सेवा, शिष्यवृत्ती आणि अनुदान यांसारख्या इतर कल्याणकारी सेवांप्रमाणेच, आता आरोग्य सेवा देखील खासगी हातात दिल्या जात आहेत."

आंदोलनाच्या मुख्य मागण्या

या लढ्याअंतर्गत BMC आणि राज्य आरोग्य अधिकाऱ्यांसमोर सहा प्रमुख मागण्या ठेवण्यात आल्या आहेत:

1. शताब्दी आणि लल्लुभाई कंपाउंड रुग्णालयांसह, मुंबईतील कोणत्याही सरकारी रुग्णालयाला खासगीकरण प्रक्रियेतून, विशेषत: पब्लिक–प्रायव्हेट पार्टनरशिप (PPP) मॉडेलमधून, तात्काळ आणि पूर्णपणे बाहेर काढावे.

2. एम पूर्व प्रभागातील सर्व मॅटर्निटी रुग्णालयांमध्ये नवजात शिशू विशेष चिकित्सा युनिट (NICU) तात्काळ सुरू करावी, आणि सर्व रिक्त पदे तात्काळ भरावीत. महाराष्ट्र नगर मॅटर्निटी होम तात्काळ पुन्हा सुरू करावे.

3. सर्व सरकारी रुग्णालयांमध्ये पुढील 30 दिवसांत मोफत निदान तपासणी सेवा सुरू कराव्यात.

4. रुग्णालये आणि आरोग्य केंद्रांमधील सर्व रिक्त पदांसाठी 30 दिवसांत जाहिरात प्रसिद्ध करून, तीन महिन्यांत पदभरती प्रक्रिया पूर्ण करावी.

5. सर्व महापालिका दवाखान्यांमधील रिक्त पदे तात्काळ भरावीत, आणि NBC / UDPFI मानकांनुसार प्रत्येक 15,000 लोकसंख्येमागे एक दवाखाना या प्रमाणात पुढील 3 महिन्यांत 38 नवीन दवाखाने स्थापन करावेत.

6. दरमहा प्रभाग कार्यालयात सार्वजनिक आरोग्य सेवा समीक्षा बैठक घ्यावी, ज्यामध्ये जबाबदार आरोग्य अधिकारी सहभागी व्हावेत, आणि लोकांच्या तक्रारींचे निराकरण करून सेवांमध्ये सुधारणा करण्याबाबत चर्चा करून निर्णय घ्यावेत.

आंदोलनाची सूचना आधीच देण्यात आली होती, तरीही त्यावेळेला BMC ने प्रभाग कार्यालयात कोणताही जबाबदार अधिकारी पाठवला नाही. आंदोलनकर्त्यांना फक्त इतकेच आश्वासन देण्यात आले की, त्यांची वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत आणखी एक बैठक होईल. परंतु ही उदासीनता आंदोलनाला थांबवू शकणार नाही. आता या भागातील जनता येत्या काही महिन्यांत अधिक तीव्र आणि संघटित आंदोलनाची तयारी करत आहे.

एकजुट वाढवा, संघर्ष व्यापक करा

आता मुंबईतील इतर सामाजिक संघटनांनी या लढ्याचा भाग बनणे आवश्यक आहे. जन आरोग्य अभियानाने नुकतेच या आंदोलनाला राज्य पातळीवर समर्थनाचा ठराव मंजूर केला आहे. मुंबईतील हे खासगीकरण फक्त स्थानिक मुद्दा नाही. देशभरात आरोग्य सेवांचे खासगीकरण, पीपीपीच्या माध्यमातून आरोग्यसेवा विकण्याची प्रक्रिया मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. अशा प्रकारचं खासगीकरण जबरदस्तीने रेटलं जात आहे, जरी अनुभवाने स्पष्ट झालं असलं की पीपीपी मॉडेल्स गरीबांना आरोग्य सेवांपासून वंचित ठेवतात, यामुळे उपचार महाग होतात, सेवांचा दर्जा घसरतो, आणि सामाजिक जबाबदारी नाहीशी होते.

(पान ३२ वर)

आघाडीवर

९ जुलैच्या देशव्यापी कामगार संपात संपूर्ण सहभाग

NAPM

नॅशनल अलायन्स ऑफ पीपल्स मूव्हमेंट्स (NAPM) ९ जुलै रोजी संयुक्त किसान मोर्चा, केंद्रीय कामगार संघटनांचे संयुक्त व्यासपीठ आणि स्वतंत्र फेडरेशन्स यांच्या वतीने दिलेल्या देशव्यापी संपाच्या आवाहनाला पूर्ण पाठिंबा देत सहभागी झाले. संपाच्या या आवाहनासोबतच, NAPM निवडणूक यादींच्या विशेष सखोल पुनरावलोकन (SIR) प्रक्रियेचा तीव्र निषेध करते आणि त्याच दिवशी विरोधी पक्षांनी दिलेल्या बिहार बंदच्या आवाहनाला पाठिंबा जाहीर करते.

भारतात सध्या क्रोनी भांडवलशाहीचे (crony capitalism) प्रमाण वाढलेले आहे, ज्यामुळे मोजक्या लोकांकडे प्रचंड संपत्ती जमा होत आहे आणि दुसरीकडे कामगार वर्ग अधिकाधिक गरिबीच्या गर्तेत अडकत चालला आहे. मोदी सरकारच्या काळात हे अधिक वेगाने घडत आहे. हे सरकार सार्वजनिक क्षेत्रातही कामाचे अनौपचारिकरण धोरण जोरात राबवत असून, यामुळे कामगारांचे प्रचंड शोषण होत आहे आणि ८ तास कामाचा हक्क, कायदेशीर किमान वेतन यांसारख्या ऐतिहासिक लढ्यांची पायमल्ली होत आहे.

४० पेक्षा जास्त कामगार कायदे रद्द करून कामगारविरोधी चार मजुरी संहितांची अंमलबजावणी करणे ही भारतातील कामगार चळवळीच्या इतिहासाला आणि परंपरेला पुसून टाकण्याचा, तसेच कामगार संघटनांना रोखण्याचा एक घृणास्पद प्रयत्न आहे. हे उपजीविका, किमान वेतन आणि सामाजिक सुरक्षा यांच्यावर मोठा आघात आहे.

या देशातील लाखो शेतकऱ्यांनी तीन कृषी कायद्यांविरोधात प्रचंड आंदोलन उभं केलं आणि सरकारला ते कायदे मागे घ्यायला भाग पाडलं. मात्र तरीही केंद्र सरकारने शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे, कारण शेतमालाला हमीभाव (MSP) मिळावा ही त्यांची प्रमुख मागणी अजूनही पूर्ण झालेली नाही. यामुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष आहे आणि अनेक ठिकाणी शेतकरी आत्महत्या करत आहेत.

शेती क्षेत्रावर कॉर्पोरेट नियंत्रण आणण्यासाठी सरकार सातत्याने प्रयत्न करत आहे, ज्याचा मोठा फटका लहान शेतकरी, पारंपरिक मच्छीमार, आदिवासी आणि जंगलावर अवलंबून असलेल्या समुदायांना विशेषत: महिलांना बसत आहे. दुसरीकडे, देशातील लोकशाहीविरोधी वातावरण दिवसेंदिवस गंभीर होत चालले आहे. मोदी सरकारच्या विरोधात शांततेने आंदोलन करणं किंवा टीका करणं देखील आता धोकादायक ठरत आहे. अनेक कार्यकर्ते आणि संघटनांवर सरकारकडून वेगवेगळ्या प्रकारचे दडपशाहीचे उपाय योजले जात आहेत.

आपल्या संसदीय लोकशाहीचा पाया असलेल्या निवडणुकाही आता भारतीय जनता पक्षाच्या फायद्यासाठी वळवल्या जात आहेत. इलेक्टोरल बाँड घोटाळ्यानंतर महाराष्ट्र निवडणुकांमध्येही गंभीर प्रक्रियात्मक त्रुटींवर विरोधी पक्षनेत्यांनी आक्षेप घेतला. आता बिहारमध्ये राज्य निवडणुकांआधी मतदार यादींचे विशेष सखोल पुनरावलोकन (Special Intensive Revision - SIR) सुरू आहे, ज्यामुळे अनेक लोकांचा सहभाग नाकारला जात आहे. यामुळे लोकशाहीची स्थिती अधिकच अस्थिर झाली असून सत्ताधारी पक्षाचे खरे स्वरूप उघड झाले आहे.

या पार्श्वभूमीवर, आम्ही देशातील सर्व लोकशाहीविषयक शक्तींना आवाहन केले की त्यांनी एकत्र येऊन ९ जुलै २०२५ रोजीच्या अखिल भारतीय संपाला यशस्वी करण्यासाठी पुढाकार घ्यावा. देशभरातील विविध संघटनांनी, फेडरेशन्सनी आणि आघाड्यांनी मांडलेल्या मागण्यांना आम्ही पूर्ण पाठिंबा देतो. या मागण्यांमध्ये मजुरांसाठी बनवलेले चार नविन (आणि अन्यायकारक) श्रम संहितांचे रद्दकरण, किमान वेतनाची हमी, सामाजिक सुरक्षा, संघटनांची (युनियन) निर्मिती करण्याचा हक्क, आणि जनहित व पर्यावरणपूरक कायद्यांचे सुरू असलेले ह्रास थांबवण्याची मागणी यांचा समावेश आहे. याशिवाय, लाखो कामगारवर्गीय नागरिकांना विशेषत: असंघटित क्षेत्रातील कामगार, अल्प भू धारक शेतकरी, जंगलावर अवलंबून असलेली आदिवासी आणि पारंपरिक समुदाय यांना जमीन, उपजीविका व जंगल हक्क सुनिश्चित करून देण्याचीही आमची ठाम मागणी आहे.

आम्हाला गप्प करता येणार नाही. आपण सर्वजण एकत्र येऊ या द्वेषमूलक राजकारणाविरुद्ध, मजूर–विरोधी, शेतकरी–विरोधी, अल्पसंख्याक–विरोधी आणि जनविरोधी, लोकशाहीविरोधी धोरणांविरुद्ध एक मजबूत आवाज बनू या.

२. पश्चिम बंगालमध्ये त्वरित मनरेगा काम सुरू करा आणि मनरेगा कायद्याची कलम २७ रद्द करा!

३. डिजिटल उपस्थिती (NMMS) आणि आधार–आधारित पेमेंट प्रणाली (ABPS) यासारखे सर्व कामगारविरोधी तांत्रिक आदेश रद्द करा!

४. काम झाल्यानंतर १५ दिवसांच्या आत वेतन द्या, आणि विलंब झाल्यास त्याचे नुकसानभरपाई द्या!

५. ग्रामीण विकासविषयक संसदीय स्थायी समितीच्या सर्व शिफारसी लागू करा!

६. जबरदस्तीने रद्द केलेले सर्व जॉब कार्ड पुन्हा चालू करा!

(आघाडीवर: पान ३० वरुन)

आता आंदोलनकर्ते येत्या एका महिन्यात झोपडपट्ट्यांमध्ये प्रचार मोहीम राबवणार आहेत, आणि मुंबईच्या इतर भागांमध्ये या समितीचा विस्तार करणार आहेत. लवकरच प्रभाग कार्यालयासमोर जन सुनावणी आयोजित केली जाईल, जिथे रुग्णालयांची सद्य:स्थिती आणि मागण्या जाहीरपणे मांडल्या जातील. अशी व्यापक आणि दीर्घकालीन रणनीती आवश्यक आहे, कारण आरोग्य सेवांच्या खासगीकरणामागे अत्यंत शक्तिशाली राजकीय आणि कॉर्पोरेट हितसंबंध आहेत. यांना थांबवण्यासाठी मोठ्या आणि सतत चालणाऱ्या संघर्षाची गरज आहे. गोवंडी–मानखुर्दचा हा लढा दर्शवतो की, लोक आता आरोग्य सेवांच्या बाबतीत अन्याय सहन करणार नाहीत. ते संघटित होत आहेत, जागरूक होत आहेत, आणि आपल्या हक्कांसाठी उभे राहत आहेत. ही फक्त मुंबईतील दोन रुग्णालये वाचवण्याची लढाई नाही, तर संपूर्ण देशाच्या आरोग्य व्यवस्थेला वाचवण्यासाठी आंदोलनाची एक नवीन आणि दमदार आघाडी आहे.

(लेखक 'रुग्णालये वाचवा, खासगीकरण थांबवा' कृती समितीचे कार्यकर्ते आहेत. हा लेख 'जन स्वास्थ्य अभियानाच्या' 'आरोग्याच्या आघाडीवर' या ब्लॉग वर प्रसिद्ध झाला आहे.)

अनुवाद: दीपक जाधव

abhayshukla1@gmail.com

मागील अंकात पान १० वर **'वृत्तांत'** या सदरात प्रकाशित झालेल्या **'सळसळत्या उत्साहाची नववी महाराष्ट्र महिला आरोग्य परिषद'** या लेखाचे लेखक अच्युत बोरगावकार आहेत. नजरचुकीने त्यांच्या नावाचा उल्लेख राहून गेला. **मनपूर्वक क्षमस्व!**

९ जुलैच्या देशव्यापी संपामध्ये मनरेगा कामगारांनी मोठ्या प्रमाणावर सहभागी व्हावे, असे आवाहन!

मनरेगा संघर्ष मोर्चा संयुक्त मंच, केंद्रीय ट्रेड युनियन, स्वतंत्र फेडरेशन्स आणि संयुक्त किसान मोर्चा यांनी ९ जुलै २०२५ रोजी जाहीर केलेल्या देशव्यापी संपातील सर्व महत्त्वाच्या मागण्यांना पूर्ण पाठिंबा देतो.

संयुक्त मंच आणि संयुक्त किसान मोर्चा यांनी त्यांच्या मागणीपत्रामध्ये मनरेगा कामगारांच्या मागण्यांचा समावेश केल्याचे स्वागत करतो. मनरेगा कामगार हे देशातील सर्वात मोठ्या एकल कामगार शक्तींपैकी एक आहेत, ज्यात महिलांचा, आदिवासींचा आणि दलितांचा मोठा सहभाग आहे. त्यामुळे श्रमिक–कृषक ऐक्य घडवून आणण्यासाठी मनरेगा कामगारांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

मनरेगा संघर्ष मोर्चा देशभरातील मनरेगा कामगारांना त्यांच्या प्रमुख मागण्यांसह ९ जुलैच्या देशव्यापी संपात सहभागी होण्याचे आवाहन करतो:

१. मनरेगा रोजंदारी रू.८०० प्रतिदिन करा!

२. पश्चिम बंगालमध्ये त्वरित मनरेगा काम सुरू करा आणि मनरेगा कायद्याची कलम २७ रद्द करा!

३. डिजिटल उपस्थिती (NMMS) आणि आधार–आधारित पेमेंट प्रणाली (ABPS) यासारखे सर्व कामगारविरोधी तांत्रिक आदेश रद्द करा!

४. काम झाल्यानंतर १५ दिवसांच्या आत वेतन द्या, आणि विलंब झाल्यास त्याचे नुकसानभरपाई द्या!

५. ग्रामीण विकासविषयक संसदीय स्थायी समितीच्या सर्व शिफारसी लागू करा!

६. जबरदस्तीने रद्द केलेले सर्व जॉब कार्ड पुन्हा चालू करा!

वृत्तांत

जन आंदोलनांच्या राष्ट्रीय समन्वयाचे कार्यकर्ता संवाद शिबिर

वैभवी आढाव

जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय (NAPM), महाराष्ट्र यांच्या वतीने कार्यकर्त्यांचे संवाद शिबिर २८ ते ३० जून २०२५ दरम्यान उमरकांचन, ता. पाटण, जि. सातारा या गावात वांग मराठवाडी धरण परिसरात उत्साहात पार पडले. शिबिराच्या सुरूवातीस स्थानिक गावकऱ्यांच्या वतीने सुनील मोहिते यांनी सर्वांचे स्वागत केले, सुनिती सु. र. यांनी प्रास्ताविकातून शिबिराच्या उद्दिष्टांवर प्रकाश टाकला. उद्घाटनपर भाषणात डॉ. राजेंद्र कुंभार म्हणाले, "अनैतिकता आणि भ्रष्टाचाराच्या विरोधात लढण्यासाठी शिक्षण हे सर्वात प्रभावी हत्यार आहे. समाजात सांस्कृतिक पातळीवर सकारात्मक हस्तक्षेप करण्याची गरज आहे". त्यांनी ग्रामीण संघर्षांच्या अनुभवातून, 'पवनचक्कींसाठी रस्ते झाले, पण माणसांसाठी नाही', या विधानातून विकासाच्या विसंगतीवरही बोट ठेवले. "शिक्षणासारखं काहीतरी दिलं जातं, पण खरं शिक्षण दिलं जात नाही. हीच आजची शोकांतिका आहे," असे ते म्हणाले. त्यांनी असेही स्पष्ट केले की, "गावात वर्षानुवर्षे तेच पंच का निवडले जातात, यावर प्रश्न विचारले गेले पाहिजेत. देवळाला पैसे खर्च केले जाताना त्याच गावातील शाळेला पत्रे आहेत का याचा विचार करण्याची हीच वेळ आहे. शिक्षण ही लढायची गोष्ट आहे," आणि "चळवळ व स्वातंत्र्य ही रोजच्या जीवनातील गोष्ट आहे." शिबिराचे संयोजक संजय रेंदाळकर यांनी उद्घाटन सत्राचे सूत्रसंचालन केले. वांग मराठवाडी कृती समितीचे सचिव प्रताप मोहिते यांनी उपस्थितांचे आभार मानले. उद्घाटन सत्रातून एक स्पष्ट संदेश दिला गेला ही लढाई बाजारविरोधी, मनुष्यकेंद्री, देशभक्त आणि मानवतावादी आहे; आणि तिची सुरुवात स्वत:पासूनच होते.

संविधान, स्वातंत्र्य चळवळ आणि समताधिष्ठित विकास

शिबिराच्या दुपारच्या सत्रात सुनिती सु. र. यांनी "स्वातंत्र्य व संविधानाची पार्श्वभूमी" या विषयावर सखोल आणि प्रेरणादायी विचार मांडले. त्यांनी भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील विविध परंपरांचा आढावा घेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, जयप्रकाश नारायण आदींच्या योगदानाची उजळणी केली. त्यांनी स्पष्ट केले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा लढा हा केवळ राजकीय नव्हे तर सामाजिक आणि सांस्कृतिक स्वातंत्र्यासाठी होता. गांधींच्या विचारांमध्ये असलेली समताधारित विकासाची संकल्पना त्यांनी अधोरेखित केली. जेपींचे सर्व स्तरांवरील आंदोलन आणि नर्मदा बचाव आंदोलनासारख्या लढ्यांनी सामाजिक अन्यायाविरुद्धचा लढा सशक्त केला, असेही त्यांनी नमूद केले. "विकास कुणाचा आणि बळी कोणाचा ?" या प्रश्नावर त्यांनी विशेष भर दिला. नर्मदा आंदोलनाला यंदा ४० वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर त्यांनी विकासाच्या नावे होणाऱ्या विस्थापन, विषमता आणि विनाशाचे वास्तव समोर ठेवले. NAPM ने या मुद्द्यांना राजकीय पटलावर आणण्याचे ऐतिहासिक कार्य केले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शाश्वत विकासाचा पर्याय हा जागतिकीकरणाच्या धोरणांना विरोध करणाऱ्या चळवळींमध्येच आहे, असे सांगून त्यांनी समाजासाठी हवी असलेली मूल्ये म्हणजे 'समता, सादगी आणि स्वावलंबन' यावर भर दिला. "साधेपणा म्हणजे प्रत्येक व्यक्तीला किमान समान संधी मिळणे," असे सांगत त्यांनी विकासाची नवी व्याख्या मांडली. "स्त्रीवर जसा बलात्कार होतो, तसाच जल–जमीन–जंगलावरही होतो आहे," असा ठाम आणि बोचरा मुद्दा त्यांनी उपस्थित केला. संविधानाचे महत्त्व अधोरेखित करत त्या म्हणाल्या की, 'स्वातंत्र्योत्तर भारतात संविधान हे लोकशाहीचं हत्यार आहे. अहिंसेचा मार्ग हे या लढ्याचं प्रमुख शस्त्र असून, जल, जंगल, जमिनीचे रक्षण आणि हक्कांसाठीचा लढा ही काळाची गरज आहे'. "शहरी विकास बांडगुळासारखा झाला आहे तो समावेशी नाही, उपेक्षित घटकांसाठी नाही," अशी टीका त्यांनी केली. समाजातील जे जे गट नेहमीच उपेक्षित राहिले, त्यांचं प्रतिनिधित्व NAPM करते, हे त्यांनी ठळकपणे अधोरेखित केलं. "कोणी केला हिंदूंचा हिंदुस्थान ?" असा प्रश्न उपस्थित करत, त्यांनी सहिष्णुतेची परंपरा जपण्याचे आणि

आपले प्रश्न आधी समजून घेण्याचे आवाहन उपस्थित कार्यकर्त्यांना केले. या सत्रातून कार्यकर्त्यांना देशाच्या इतिहासातील लढ्यांची समज, आजच्या प्रश्नांची दिशा आणि उद्याच्या आंदोलनांची भूमिका यांची सखोल जाणीव मिळाली.

मराठवाडी धरणग्रस्त संघर्षाचे वास्तव

यानंतर कार्यकर्त्यांनी परिसराचा फेरफटका घेत वांग मराठवाडी धरण संघर्षाचे भौगोलिक व सामाजिक वास्तव प्रत्यक्ष अनुभवले. स्थानिक कार्यकर्त्यांनी लढ्याची पार्श्वभूमी सांगताना संघर्षातल्या अडथळ्यांबद्दल आणि जिद्दीबद्दल मनोगत व्यक्त केलं. पहिल्या दिवसाच्या शेवटच्या सत्रात, "यशोगाथा: वांग मराठवाडी लढा" या विशेष सत्रात स्थानिक कार्यकर्त्यांनी आपले अनुभव, अडचणी आणि आंदोलनातून मिळवलेल्या लहानमोठ्या यशांची मांडणी केली. या सत्रातून ग्रामीण संघर्षांमधील जिवंत प्रेरणा कार्यकर्त्यांपर्यंत पोचली. दिवसाचा समारोप परिवर्तनवादी गाण्यांनी झाला. गीतांच्या माध्यमातून चळवळीची ऊर्जा आणि समतेचा संदेश उपस्थितांपर्यंत पोचवण्यात आला. संघर्ष, प्रेम, आणि लोकशाही मूल्यांनी भारलेला हा दिवस प्रेरणादायी ठरला.

धार्मिक सौहार्द, पर्यावरण, आणि विकास नियोजन

शिबिराच्या दुसऱ्या दिवशी सामाजिक सलोखा, पर्यावरणीय संकटे आणि लोकशाही सशक्तीकरणाच्या मुद्द्यांवर सखोल चर्चा झाली. विविध सत्रांमधून कार्यकर्त्यांनी विचारमंथन करत हस्तक्षेपाच्या दिशादर्शक भूमिका ठरवल्या. 'सर्वधर्मीय सौहार्द आव्हाने आणि आपली जबाबदारी' यात मिनाज लाटकार यांनी मर्मग्राही आणि वास्तववादी विचार मांडले. सत्राची सुरुवात उपस्थित कार्यकर्त्यांना थेट प्रश्न विचारून झाली ''तुमच्या आयुष्यात किती मुस्लिम मित्र–मैत्रिणी आहेत ?'' यावरून त्यांनी धार्मिक सामाजिक अंतर आणि आपली रोजची व्यवहारातील भूमिका अधोरेखित केली. त्यांनी सांगितले की, अनेक मुस्लिम तरुण–तरुणी शिक्षण, नोकरी, प्रतिनिधित्व या सगळ्यांत मागे आहेत. मुस्लिम समाजाचे शिक्षणाचे प्रमाण एससी–एसटींपेक्षाही कमी असल्याची गंभीर नोंद त्यांनी केली. यामुळे संधींच्या बाबतीत होणाऱ्या अन्यायाबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. मिनाज भाई म्हणाले, ''मुस्लिम समाज सतत संशयाच्या आणि दबावाच्या वातावरणात जगतोय. लव्ह जिहाद, महिलांचा मस्जिद प्रवेश यासारख्या मुद्द्यांवरून गैरसमज पसरवले जातात, जे सत्यापासून दूर आहेत.'' ''जिहाद म्हणजे प्रयत्नाची पराकाष्ठा आत्मविकास आणि संघर्षाचा सकारात्मक अर्थ,'' अशी त्यांनी स्पष्ट व्याख्या मांडली. भारताच्या इतिहासातील टिपू सुलतान यांचा दाखला देत, ते म्हणाले की, ''टिपू सुलतान ब्रिटिशांविरोधात लढणारे पहिले शूर सैनिक होते. भारत सरकारनेही त्यांच्या कार्याची दखल घेत टपाल तिकीट काढले होते.'' त्यांनी आधुनिक शस्त्रास्त्र, रॉकेट तंत्रज्ञान आणि सेविकल्चर यातील त्यांच्या योगदानावरही प्रकाश टाकला. ''विशाळगडावरील मुजावर शतकानुशतके तिथे राहतात. पण तरीही आज त्यांना बाहेरचं ठरवण्याचा प्रयत्न होतो,'' अशी खंत त्यांनी बोलून दाखवली. वर्धनगड दर्ग्याचा उध्वस्त झालेला इतिहास त्यांनी नमूद करत शासनपुरस्कृत धार्मिक ध्रुवीकरणाचे वास्तव मांडले. त्यांनी ठामपणे सांगितले की, ''उर्दू ही केवळ मुस्लिमांची भाषा नाही. मुस्लिम संस्कृती, त्यांची परंपरा, संघर्ष आणि जगण्याचे विविध पैलू समजून घेणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.'' या सत्रातून एक महत्त्वाचा संदेश दिला गेला, धार्मिक सौहार्द म्हणजे सहअस्तित्व आणि परस्पर आदर, आणि त्याची सुरुवात प्रत्येक व्यक्तीच्या कृतीतूनच घडते. दोन समाज कसे एकत्र येतील, हे पाहणे आणि समजूतदारपणाने वाटचाल करणे, ही काळाची गरज आहे.

'पर्यावरणीय संकटे: आव्हाने आणि जबाबदारी' यात चिपळूणचे पर्यावरण अभ्यासक मल्हार इंदूलकर यांनी वाढती प्रदूषण, हवामान बदल, औद्योगिकीकरणाचे दुष्परिणाम यावर प्रकाश टाकत पर्यावरण रक्षणासाठी नागरिकांच्या सक्रिय सहभागाचे महत्त्व अधोरेखित केले. अमोल वाघमारे यांनी 'स्थानिक स्वराज्य संस्थांचे सक्षमीकरण आणि आपला हस्तक्षेप', या विषयावर प्रत्यक्ष अनुभवांच्या आधारे सादरीकरण केलं. ग्रामसभा, बालसभा, महिलांची सभा यांचं महत्त्व, ७३वी घटनादुरुस्ती, माहितीचा अधिकार, मनरेगा, पेसा यांसारख्या कायद्यांच्या अंमलबजावणीसंबंधी चर्चा झाली. त्यांनी सांगितले की, ''गाव मजबूत असेल तर देश टिकेल, हे विनोबांच्या विचाराचे मर्म आजही लागू आहे. परंतु आज गावांमध्ये धर्म आणि जातीवर आधारित गट तयार होत आहेत, सामूहिकता

(पान ३६ वर)

डॉ. शरदचंद्र शंकर कुलकर्णी यांचे मुक्त व दूरस्थ शिक्षणातील योगदान

प्रा. एस. एस. कुलकर्णी यांनी भारतात मुक्त आणि दूरस्थ शिक्षण (ODL) क्षेत्राच्या प्रारंभिक काळात महत्त्वपूर्ण योगदान दिले. तंत्रज्ञानाचा उपयोग करून शिक्षणात सर्वसमावेशकता आणणारे ते द्रष्टे शिक्षणतज्ज्ञ होते. ग्रामीण आणि वंचित भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी नेहमीच तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापराचा आग्रह धरला.

अभ्यासक्रम विकास व Instructional Design मधील तज्ज्ञ म्हणून, त्यांनी शालेय शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत विविध स्तरांवरील विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेऊन विद्यार्थी केंद्रित बहुपर्यायी शिक्षणसाहित्य विकसित करण्यासाठी बहुमूल्य मार्गदर्शन केले.

१९८० च्या दशकात त्यांनी राष्ट्रीय मुक्त विद्यालयासाठी विकसित केलेले मल्टिमीडिया शिक्षणस्रोत आजही तितकेच उपयुक्त आहेत. त्याचप्रमाणे, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाच्या उच्च शिक्षण डिप्लोमासाठी त्यांनी विकसित केलेला "Instructions in Higher Education" हा अभ्यासक्रम आजही या कार्यक्रमाचा आधारस्तंभ आहे.

या अभ्यासक्रमावर काम करताना मला एक तरुण शिक्षक म्हणून त्यांच्यासोबत काम करण्याची संधी मिळाली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे मला ODL प्रणालीची नीती व कृती समजली आणि माझा शैक्षणिक प्रवास घडला.

UGC, DEC (Distance Education Council) तसेच विविध मुक्त विद्यापीठांबरोबर त्यांनी केलेले कार्य **राष्ट्रीय मुक्त आणि दूरस्थ शिक्षण धोरण** तयार करण्यासाठी खूप मोल्यवान ठरले. या धोरणामध्ये गुणवत्ता हमी, विद्यार्थ्यांसाठी आधार प्रणाली आणि तंत्रज्ञानाचा दूरस्थ शिक्षणात समावेश, क्षमता विकसनाबाबत पुढाकार, संशोधन आधारित मार्गदर्शक तत्त्वे विकसित करण्यात त्यांनी मोलाचे योगदान दिले. त्यांनी ODL पदव्यांना मान्यता आणि इतर विद्यापीठांच्या पदव्यांशी समकक्षता मिळवून देण्यासाठीही प्रयत्न केले.

त्यांच्या नेतृत्वाखाली मुक्त आणि दूरस्थ शिक्षण क्षेत्रात समुदायाधारित शिक्षण केंद्रे, स्थानिक भाषेतील अध्यापन अशा अनेक नाविन्यपूर्ण उपक्रमांची बीजे रोवली गेली, अंमलबजावणी झाली.

मुक्त शिक्षण, विद्यार्थी सेवा सुविधा, मूल्यमापन अशा अनेक क्षेत्रांतील त्यांच्या संशोधन आणि लेखनामुळे हे क्षेत्र समृद्ध झाले. शिक्षणात समता साधण्याची त्यांची प्रबळ इच्छा, आणि "आजन्म शिक्षण" संकल्पना प्रत्यक्षात आणून हजारो इच्छुकांच्या जीवनाला झालेला शिक्षणस्पर्श हीच त्यांच्या कार्याची खरी पावती आहे.

प्रा. डॉ. संतोष शेखर जेना
डीन, स्कूल ऑफ व्होकेशनल स्टडीज, डॉ. बी. आर. आंबेडकर विद्यापीठ, दिल्ली (ssjena.aud.ac.in)

MKCL
MS-CIT
MKCL KLiC Courses
Gateway to Knowledge Lit Careers
iLike

Marathi-Monthly - Andolan Shashwat Vikasasathi, Editor-Medha Patkar. Date of Publication 1st of every month
RNI No. MAHMAR/2009/30128

(वृत्तांत: पान ३४ वरुन)

कमी होत चालली आहे''. यावर उपाय म्हणून स्थानिक कार्यकर्त्यांना प्रशिक्षण, वैचारिक जडणघडण व उपजीविकेच्या संधी देण्याची गरज त्यांनी मांडली.

लोकसभेपेक्षा ग्रामसभेला अधिक अधिकार - मेधा पाटकर

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या व NAPM च्या संस्थापक मेधा पाटकर यांनी "विकास नियोजनाचे प्रश्न आव्हाने आणि आपली जबाबदारी" या विषयावर भाष्य करत विकासाच्या प्रतिमेवर प्रश्न उपस्थित केले. "विकास म्हणजे फक्त बदल नव्हे, तर समता, सादगी आणि स्वावलंबनाकडे नेणारा मार्ग असावा," असं त्यांनी सांगितलं. जमिनीच्या अधिग्रहणातून होत असलेला अन्याय, आदिवासी–शेतकरींचं विस्थापन, ऊर्जा धोरण, खाण प्रकल्प आणि केंद्रांच्या नावाखाली होत असलेले लोकांवरचे आघात यांची उदाहरणं देत त्यांनी वैकल्पिक विकास धोरणाची गरज मांडली. ग्रामसभेला अधिक अधिकार देणे, विस्थापितांविरुद्ध प्रस्थापितांची लढाई ओळखणे, आणि "जल–जंगल–जमीन वाचवा" हा संदेश त्यांनी पुन्हा अधोरेखित केला. मेधाताईंनी देशभरातील विविध समस्यांची जंत्रीच मांडली आणि या समस्यांना भिडण्यासाठी जन आंदोलनात तरुणाई आणि महिलांचे सहभागावर लक्ष देण्याचा भाग अधोरेखित केला. यावेळी साधना दधिच, शिवाजीराव परुळेकर, मुरलीधर परुळेकर आदिंसह गावातील कार्यकर्ता मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मनिष देशपांडे (पुणे) आणि पूनम कनोजिया (मुंबई) यांनी जनतेचे मूलभूत हक्क शिक्षण, आरोग्य, रोजगार, अन्न आणि निवाऱ्याविषयी सुलभ आणि संवादात्मक पद्धतीने मांडणी केली. मनिष आणि पूनमने त्यांच्या मार्गदर्शनात त्यांचे जमिनी कामाचा अनुभव जोडून मांडणीची मौलिकता वाढवली.

दुसऱ्या दिवसाच्या अखेरीस संजय रेंदाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली 'लड्डू आणि पहल', या लघुपटावर मुक्त चर्चा झाली. माध्यमांच्या उपयोगाने लोकप्रश्न अधोरेखित करण्याची दिशा यातून स्पष्ट झाली. दुसऱ्या दिवशीच्या चर्चांमधून धार्मिक सहअस्तित्व, पर्यावरण संरक्षण, लोकशाही सशक्तीकरण, आणि समतामूलक विकास या चार प्रमुख मुद्द्यांवर कार्यकर्त्यांचे लक्ष केंद्रीत राहिले. प्रश्नांची जाण, हस्तक्षेपाची गरज, आणि कृती कार्यक्रम ठरवण्याची प्रेरणा या शिबिरातून कार्यकर्त्यांनी आत्मसात केली.

कार्यकर्ता संवाद शिबिर यशस्वीरित्या संपन्न

शिबिराच्या तिसऱ्या दिवशी संविधानिक मार्ग, हस्तक्षेपाच्या रणनीती आणि NAPM च्या पुढील कृती आराखड्यावर चर्चा झाली. संविधानाचा प्रभावी वापर करत लोक जागृती करणारे कार्यकर्ते राजवैभव रामचंद्र यांनी भारतीय संविधानाचा अस्त्र म्हणून वापर कसा करता येतो याबद्दल स्वत: केलेल्या प्रयत्नांना उजाळा देत सर्वांचे प्रबोधन केले. संविधान प्रचार प्रसाराच्या पलीकडे आपण आग्रही अंमलबजावणीसाठी कृतिशील बनावे लागणार आहे असे मत मांडले. समारोप सत्रात राजेंद्र बहाळकर आणि अनेक कार्यकर्त्यांनी विधायक आणि मूल्याधारित लढ्याची गरज अधोरेखित केली. विविध सत्रांमधून ग्रामसभा, पर्यावरण, युवकांचे संघटन, आणि संविधानिक जागरूकता या मुद्द्यांवर ठोस कृती योजना ठरवण्यात आल्या. या शिबिराने नव्या पिढीतील कार्यकर्त्यांना वैचारिक बळ, दिशादर्शकता आणि संघटनशीलता प्रदान केली.

या शिबिराच्या यशस्वीतेसाठी शिबिर प्रमुख म्हणून साथी प्रताप मोहिते, साथी सुनिल मोहिते आणि गावातील प्रमुख कार्यकर्ते यांनी मोठी मदत केली. शिबिर संयोजक म्हणून संजय रेंदाळकर आणि सुजय मोरे या राज्य समन्वयकांनी प्रचंड मेहनत घेतली. राष्ट्रीय समन्वयक सुनिती सु र यांच्या बारकाईने केलेल्या नियोजनाला प्रा. विनय र. र., बाबासाहेब नदाफ, रावसाहेब आलासे यांनी हातभार लावला.

vaibhaviadhav149@gmail.com

To

'शाश्वत विकास न्यास'च्या मालकीचा 'आंदोलन-शाश्वत विकासासाठी'चा हा अंक संपादक, मुद्रक, प्रकाशक मेधा पाटकर यांनी 'श्री गुरुकृपा प्रिंटर्स' १२१, अलाइड इंडस्ट्रियल इस्टेट, राम पंजवानी मार्ग, माहिम, मुंबई ४०००१६ येथे छापून दादर, मुंबई येथून प्रकाशित केला.

प्रेषक : द्वारा केमिकल मजदूर सभा, २९-३०, पहिला मजला, 'ए' विंग, हाजी हबीब बिल्डींग, नायगाव क्रॉस रोड, दादर (पूर्व), मुंबई